दैनिक
जनप्रभात
सामाजिक पीरवर्तनाचा बुलंद आवाज

तेलघाले आव्हाड तुम्ही आता गप्पच बसा! चाकणकरांचा थेट हल्लाबोल

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज रविवारी (४ फेब्रुवारी) बारामती येथे आयोजित एका कार्यक्रमात राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे नाव न घेता त्यांच्यावर जहरी टीका केली. यानंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांवर जोरदार हल्लाबोल केला. आव्हाडांच्या टीकेला मात्र, दादा गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. तेलघाले आव्हाड आता तुम्ही गप्पच बसा अस म्हणत आव्हाडांचा खरपूस समाचार घेतला आहे.

* (आष्टी) वर्धा * सोमवार दि.०४/०२/२०२४ * वर्ष : २ * अंक : २१० * पाने : ८ * किंमत : ५ रु * मुख्य संपादकः- राहुल गजरे * उपसंपादकः- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादकः-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

पंतप्रधान मोदींच्या फोटोला काळे फासले,

युवक काँग्रेसचे कुणाल राऊत यांना अटक, काय घडलं ?

नागपूर/प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या छायाचित्राला काळे फासण्याच्या आरोपाखाली महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत यांना सदर पोलिसांनी अटक केली आहे. राऊत यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह शनिवारी जिल्हा परिषद परिसरात आंदोलन केले होते. यावेळी त्यांनी केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतील फलकांवर 'मोदी सरकारची हमी'ऐवजी 'भारत सरकारची हमी' असा बदल काही केला होता. याचवेळी त्यांनी मोदींच्या छायाचित्राला काळे फासले, असा आरोप त्यांच्यावर लावण्यात आला आहे. कुणाल राऊत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शनिवारी हे आंदोलन



केले होते. केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची नागरिकांना माहिती व्हावी, हा उद्देश असायला हवा. मात्र, या फलकांवर योजना कोणासाठी, निकष काय, लाभासाठी कोणाकडे संपर्क साधावा, याची कुठलीही माहिती देण्यात आली नव्हती. जनजागृतीचा उद्देशच यामुळे पूर्ण होत नाही, केवळ प्रचारासाठी याचा वापर होत आहे, असा आरोप राऊत यांनी केला. योजनेच्या जाहिरातीत व्यक्तीविशेषाचाच अधिक उल्लेख करण्यात आला आहे. सर्व योजनांमध्ये 'भारत सरकार', असाच उल्लेख हवा. इतर सर्व ठिकाणची फलके हटविण्यात यावीत, अशी मागणीही शनिवारी आंदोलनादरम्यान केली होती. इस्लामचे अभ्यासक मुफ्ती सलमान अजहरींना गुजरात एटीएसकडून अटक, प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणी कारवाई यावरून पोलिसांनी सीआरपीसीच्या कलम ४१ अंतर्गत राऊत यांना नोटीस बजावली. त्यांनी चौकशीसाठी आपल्या सहकाऱ्यांसह उपस्थित राहावे, असे सांगण्यात आले होते. रविवारी कुणाल हे कुही परिसरातील जनसंवाद यात्रेत होते. पोलिसांनी त्यांना कुही येथून ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आल्याचे कळते. पोलिसांच्या कारवाईवर काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. या गुन्ह्यात अटक होऊच शकत नाही. पोलिस भाजपच्या दबाबात काम करीत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

गर्जा महाराष्ट्र माझा व भारतीय सणांनी गुंजले सरस्वती इन्स्टिट्यूट सरस्वती इन्स्टिट्यूट संस्काराचे माहेरघर - डॉ नारायण मेहेरे

दिलीप येवले/प्रतिनिधी

कोराडी,- छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेडरा संचालित सरस्वती हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय बोखारा , सरस्वती भवन कॉन्व्हेंट अँड हायस्कूल ,रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य मुक्त विद्यापीठ येथे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे संचालक सचिव डॉक्टर मारोती वाघ , प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या संचालिका प्राचार्य सौ.लता वाघ,अंत्योदय महाविद्यालय देवग्राम चे प्राचार्य देवेंद्र भोंगाडे, डॉ नारायण मेहरे संचालक मुक्त विद्यापीठ नागपूर विभाग , भारतीय शिक्षण मंडळ विदर्भ प्रांताचे संगठन मंत्री डॉ नीतेशजी सिंह , सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर येथे कार्यरत असलेले प्रेरणादायी वक्ते जी.एस हेडाऊ, रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालय च्या प्रभारी प्राचार्य डॉ अर्चना पत्की,सरस्वती भवन कॉन्व्हेन्ट अँड ज्युनिअर पान २ वर

आज विभागीय आयुक्त बिदरी यांच्या हस्ते पंचायत समिती व ग्रामपंचायतीचा गौरव



दैं.जनप्रभात
दिलीप येवले /प्रतिनिधी

नागपूर ,: यशवंत पंचायतराज अभियानात राज्यस्तरीय व विभागीय पुरस्कार विजेत्या पंचायत समिती आणि संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सरस ठरलेल्या विभागातील ग्राम पंचायतींना आज ५ फेब्रुवारी रोजी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण सोहळा वंसतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती) येथे सकाळी ११ वाजता होणार आहे. यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारांतर्गत नागपूर विभागातील वर्ष २०२०-२१ आणि वर्ष २०२२-२३ च्या पुरस्कारांत राज्यस्तरावर व विभागात उत्तम ठरलेल्या पंचायत समितिंना गौरविण्यात येणार आहे. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.या अभियानांतर्गत विविध श्रेणीमध्ये सरसर कामगिरी करणाऱ्या नागपूर विभागातील ग्राम पंचायतींना वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ (एकत्रित पुरस्कार) आणि वर्ष २०१९-२०च्या पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे.

नरेंद्र गुळघाने यांना राज्यस्तरीय काव्य भूषण पुरस्कार



दैं.जनप्रभात
आष्टी तालुका प्रतिनिधी

नुकत्याच संघर्ष बहुउद्देशीय संस्था नागपूर डरा अखिल भारतीय कर्मयोगी संत गाडगेबाबा साहित्य व कला मंच च्या वतीने प्रथम वर्धापन दिन व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वेणा नदीच्या तीरावर असलेल्या विश्वशांती वेणावन शांती विहार हिंगणा येथे २०२४ चा राज्यस्तरीय'' महाराष्ट्र काव्यभूषण पुरस्कार ''कारंजा तहसील कारंजा जिल्हा वर्धा हल्ली मुक्काम तळेगाव तालुका आष्टी जिल्हा वर्धा येथील रहिवासी प्रथितयश कवी साहित्यिक नरेंद्र साहेबरावजी गुळघाने यांना हा मानाचा पुरस्कार प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, राष्ट्रीय युवा प्रबोधनकार सतीश सोमकुवर, माणिकराव खोब्रागडे आंबेडकरवादी विचारवंत ,गझलकार प्रा.सुजाता मेश्राम मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत शाल ,पुष्पगुच्छ ,सन्मानचिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. नरेंद्र गुळघाने यांचे शिक्षण एम ए (एम एल टी) आणि डिप्लोमा इन ॲग्रीकल्चर असून ते सध्या ग्रामसेवक पदावर आष्टी येथे कार्यरत आहेत. त्यांना काव्य लेखन, ललित लेखन, अभंग, चारोळी आध्यात्मिक लेख ,वैचारिक लेखन, गीत, लेखन ,पोवाडे, लावणी भारुड लेखनाचा छंद आहे .त्यांचे निसर्ग ,प्रेम, अध्यात्मिक, सामाजिक, वैच ारिकआदिवासी,विद्रोही,आंबेड करी या सर्व विषयावर ३५५२ कविता लेखन ,अभंग लेखन ५५० अभंग तसेच पान २ वर

दिव्यांशूच्या मृत्यूचे कारण अद्यापही अस्पष्ट

दैं.जनप्रभात
अतुल दंढारे / प्रतिनिधी

नरखेड - तालुक्यातील सिंजर येथे मनाला सुन्न करणारी घटना शुक्रवारी सकाळी ९ च्या सुमारास उघड आली. गुरवारी सायंकाळी ५ वाजता पासून हरवलेल्या मुलाचा गावालगतच्या शेतातील विहिरीत सापडला मृतदेह. दिव्यांशू देवेंद्र भिल्लम असे मृत मुलाचे नाव आहे. तो ३ वर्ष ६ महिन्याचा होता. गुरवारी सायंकाळी ५ च्या सुमारास बहिणीच्या मागे काकांकडे असलेल्या कार्यक्रमात गेला असल्याचे सांगण्यात येत होते परंतु तो काकांकडे पोहचलाच नाही. सर्वत्र त्याचा शोध घेतला तो कुठेही सापडला नाही. पोलिसांनी व डॉग स्कॉड यांनी सुध्दा मुलाचा सर्वत्र शोध घेतला परंतु तो कोणालाही सापडला नाही. शुक्रवारी सकाळी ९ च्या सुमारास गावालगतच्या शेतातील विहिरीत त्या मुलाचा मृतदेह आढळला. विशेष म्हणजे ज्या विहिरीत मुलाचा मृतदेह सापडला त्या विहिरीत गावातील नागरिकांनी गुरवारी रात्री ८ च्या सुमारास पाहणी केली तेव्हा त्यांना त्या विहिरीत मुलाचा मृतदेह दिसला नाही. तसेच विहरीकडे जाणारा रस्ता इतका खडतर आहे की तो लहानसा मुलगा त्या रस्त्यांनी एकटा जाऊ शकत नाही. तसेच त्या रस्त्यावर काटे सुध्दा असल्यामुळे बिना चपल्लनी एखादा मोठा

- गावकऱ्यांनी वर्तवली घातपाताची शक्यता.
- सर्वांचे लक्ष पोलिसांच्या तपासाकडे.
- जादू टोन्यातुल बळी घेतल्याची चर्चा.
- विहिरीवर जाणारा रस्ता खडतर.
- मुलगा विहिरीवर एकटा जाऊच शकत नसल्याची घरच्यांची प्रतिक्रिया.
- मुलाच्या मारेकऱ्यांचा शोध लावा गावकऱ्यांची मागणी.
- पोलिस अधीक्षक यांनी स्वतः येऊन करावी घटना स्थळाची पाहणी.



व्यक्ती जाणे शक्य नाही तर तो ३ वर्षाचा मुलगा कसा जाईल हा एक प्रश्न उपस्थित होत आहे. पोलिस म्हणतात की तो मुलगा त्या रस्त्यांनी गेला असावा तर मग त्या रस्त्यांनी बोरीचे काटे आहेत त्यामुळे त्या मुलाच्या पायावर कसलेही निशाण का नाही?. गावकरी रात्रीच्या वेळेस त्या विहिरीत मुलाला शोधायला गेले तेव्हा तो मुलगा त्या विहिरीत दिसला का नाही?. तो मुलगा त्या रस्त्यांनी जात होता तर आजू बाजूच्या लोकांना दिसला कसा नाही ? विहिरीत जर पडला तर त्याच्या शरीरावर लागल्याचे निशाण का नाही ? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. जादू टोन्यातून सुध्दा मुलाला उचलल्या जाऊ शकते अशी शक्यता काही गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे. तसेच हा खूनच असल्याचे गावकरी म्हणत आहे. त्यामुळे पोलिसही सर्व बाजूंनी कसून चौकशी करावी अशी मागणी मुलाच्या घरच्यांनी व गावकऱ्यांनी केली आहे. पोलिस अधीक्षक यांनी स्वतः येऊन या घटनास्थळ ची पाहणी करावी अशी मागणी गावकरी करत आहे.

भाग २

स्नेहसंमेलनातून समाज प्रबोधनाचा जागर

दै,जनप्रभात
उपसंपादक / राठोड रमेश पंडित

उदगीरः- उदगीर तालुक्यातील हकनकवाडी येथील सत्यशोधक पर्यावरण विकास विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विशेष म्हणजे स्नेहसंमेलनातून समाज प्रबोधनाचा जागर घालण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी उपस्थित होते. उद्घाटक म्हणून तोंडार येथील ओमसाई सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष शिवकुमार पांडे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून समर्थ विद्यालयाचे पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, सहसचिव प्रणयन चौधरी,विरभद्र बिरादार, संदीप बिरादार, मष्णाजी सुरनर, डोंगरशेळकीचे माजी सरपंच ज्ञानोबा मुंढे, मुख्याध्यापक चंद्रपाल पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी सरस्वती व स्व. व्यंकटेश चौधरी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावी च्या विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक गाण्यांवर बहारदार नृत्य सादर करून रसिक श्रोत्यांची मने जिंकली. समाजप्रबोधन पर अनेक देखावे व पर्यावरणाची नाटिका सादर करण्यात आली. प्रास्ताविक मुख्याध्यापक चंद्रपाल पाटील यांनी केले. सूत्रसंचालन रसूल पठाण, अमर जाधव यांनी केले. तर आभार संतोष कांबळे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येनी उपस्थित होते.



सांप्रदायिक संस्कृती मनामनामध्ये रुजली पाहिजे : ना. संजय बनसोडे



दै,जनप्रभात
उपसंपादक / राठोड रमेश पंडित

लातूर/उदगीरः- मानवता हा एकच धर्म समजुन आपण सर्वांनी एकत्रित येवून सर्वधर्म समभाग, बंधुभाव समाजात रुजविण्याचे काम करावे. महाराष्ट्राच्या मातीतून कलाकार तयार होतात असे मोठे कलाकार अशा भजन स्पर्धेमधुन घडत असतात. शेल्हाळ गावाला आज प्रतिपंढरीचे स्वरूप आले असुन गेल्या ७ वर्षापासून मानव सेवा प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजीत राज्यस्तरीय सामुहिक खुल्या वारकरी सांप्रदायिक भजन स्पर्धे चे आयोजन केले जाते ही बाब कौतुकास्पद आहे. आपली ही सांप्रदायिक संस्कृती मनामनामध्ये रुजली गेली पाहिजे असे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर तालुक्यातील शेल्हाळ येथील मानव सेवा प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजीत राज्यस्तरीय सामुहिक खुल्या वारकरी सांप्रदायिक भजन स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. भास्कर महाराज सांडोळकर, उद्घाटक ह.भ.प. प्रशांत महाराज खानापुरकर. हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून पंडित कल्याण गायकवाड, पान २ वर

नको आम्हाला आरक्षण, आम्हाला द्या सैरक्षण. श्री संजय हाळनोर





दै,जनप्रभात
उपसंपादक / राठोड रमेश पंडित

छ, संभाजी नगरः- छत्रपती संभाजी नगर येथे हिट अँड रन या कायद्याला विरोध करण्यासाठी आणि वाहन चालक सुरक्षा कायदा लागू करण्यासाठी जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संस्था प्रणित जय संघर्ष संघटनेच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. संस्थेचे कोअर कमिटी उपाध्यक्ष श्री संतोष काळवणे व जय संघर्ष संघटनेचे कोअर कमिटी मेंबर्स श्री रमेश कोलते आणि श्री भाऊसाहेब येळवे यांच्या नेतृत्वाखाली संभाजी नगर कडून जळगावच्या दिशेने जाणार्या वाहनांचा रस्ता अडवून वाहतूक थांबवण्यात आली होती.तर छत्रपती संभाजीनगर कडून जळगावच्या दिशेने जाणारी वाहने संस्थापक अध्यक्ष श्री संजय हाळनोर यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती संभाजीनगर येथील रिक्षा चालक मालक तसेच धुळे, जळगाव, हर्सूल, नारेगाव, नंदुरबार आणि नाशिक व सिल्लोड येथील सदस्यांनी सरकार विरोधी जोरदार घोषणाबाजी करुण परिसर दणाणून सोडला होता. सोबतच्या फोटो मध्ये आपण पाहू शकता की संभाजी नगर कडून जळगावच्या दिशेने जाणार्या रोडवर वाहनांचा शुकशुकाट तर जळगाव कडून छत्रपती संभाजीनगर कडे येणार्या रोडवर दूरवर वाहनांच्या लागलेल्या रांगा दिसत आहेत. आणि आंदोलकांना जबरदस्तीने ओढत नेऊन रस्ता खुला करण्याच्या प्रयत्नात हर्सूलचे पोलीस प्रशासन.

> आंदोलना दरम्यान बोलतांना जय संघर्ष संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री संजय हाळनोर मणाले की गेली ७० वर्षांमध्ये ड्रायव्हर समाजावर सरकारने ७ हजार रुपये देखील खर्च केलेले नसतांना आणि ज्या ड्रायव्हरला महिन्या काठी फक्त ७ हजार रुपये पगार आसतांना त्यांच्या कडून ७ लाख रुपयांची वसुली कशी काय करू शकता आसा खडा सवाल उपस्थित केला. ?

संपादकीय .....

शेवट गोड झाला...

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि अयोध्येत उभारण्यात आलेल्या राम मंदिराचे खर्या अर्थाने शिल्पकार असलेले लालकृष्ण अडवाणी यांना 'भारतरत्न' हा देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार केंद्र सरकारकडून जाहीर झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पुरस्काराची घोषणा केली. त्यानंतर पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लालकृष्ण अडवाणी यांना फोन करून त्यांचे अभिनंदन केले. त्यावर लालकृष्ण अडवाणी यांनी समाधान व्यक्त करून आपल्या देशाविषयीच्या समर्पित भावना व्यक्त केल्या. लालकृष्ण अडवाणी भाजपमधील हार्ड कोअर म्हणजे कडवट हिंदुत्ववादी नेते म्हणून ओळखले जातात. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतीच अयोध्येत रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा करून राम मंदिराचे लोकार्पण करण्यात आले, त्यासाठी भारताच्या इतिहासात नरेंद्र मोदी यांची नोंद घेतली जाईल. कारण राम मंदिराची उभारणी ही बाब अतिशय अवघड होती. श्रीराम हे हिंदूंचे आराध्य दैवत असले आणि हा देश जरी हिंदूबहुल असला तरी राम मंदिराला इथल्या अनेक हिंदूंचाच विरोध होता. त्याला त्यांनी सर्वधर्मसमभावाचा रंग दिलेला होता, हेच जर कुठल्या दुसर्या धर्मियांच्या विषयी असले असते तर ती त्यांची धार्मिक बाब आहे, म्हणून त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले गेले असते. त्यामुळे बरेचदा या हिंदूबहुल देशात हिंदूंची अवस्था स्वत:च्या घरी दूरचा पाहुणा मी, अशी होऊन बसते. राम मंदिरासाठी मोठा न्यायालयीन लढा द्यावा लागला. कपिल सिब्बल यांच्यासारखे धर्माने हिंदू असलेले लोकच राम मंदिराच्या विरोधात वकीलपत्र घेऊन सर्वोच्च न्यायालयात लढत होते.राम मंदिर उभारण्यासाठी या हिंदूबहुल देशातील हिंदूंचा पाचशे वर्षे संघर्ष सुरू होता, या प्रदीर्घ कालावधीत अनेक हिंदूंनी बलिदान दिले. या सगळ्या समर्पणाची जाणीव लालकृष्ण अडवाणी आणि नरेंद्र मोदी या दोघांना होती, त्यातूनच राम मंदिर उभे राहिले. आता राम मंदिर उभे राहिले असले तरी त्याच्या जागेवर पाचशे वर्षांपूर्वी मुस्लीम शासक बाबर याने जी मशीद बांधली होती, याचे काय करायचे हा प्रश्न होता. त्यासाठी मंदिर वही बनायेंगे, हा निश्चय करून लालकृष्ण अडवाणी यांनी सोमनाथ ते अयोध्या अशी रथयात्रा सुरू केली. त्याला लोकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. हिंदूंच्या मनात काही शतकांपासून भीतीमुळे दबून राहिलेल्या भावनांना व्यक्त होण्यासाठी त्यामुळे वाव मिळाला. त्यानंतर अयोध्येत राम मंदिराच्या जागेवर असणारी मशीद कारसेवकांनी उद्ध्वस्त केली. राम मंदिर उभारले जावे, ही भावना अनेक हिंदूंच्या मनात होती. विश्व हिंदू परिषद आणि काही हिंदुत्ववादी संघटनांचे त्यासाठी प्रयत्न सुरू होते. पण जेव्हा लालकृष्ण अडवाणी यांनी या चळवळीची सूत्रे आपल्या हाती घेतली, तेव्हा त्यात खर्या अर्थाने जोरकसपणा आला. त्यातूनच देशभर जे हिंदूमत जागे झाले त्यातूनच अयोध्येतील बाबरी मशीद पाडली गेली आणि भाजपचे दोन खासदार होते, देण्यात आल्यामुळे शेवट गोड झाला, असेच म्हणावे लागेल.

अति लोभ हा दुःखास - शोकास कारणीभूत

मानवाने लोभी वृत्ती जपावी, पण तीसुद्धा प्रमाणात असावी. अतिलोभ कधी-कधी दु: खदायक ठरू शकतो. अतिलोभामुळे शोकसुद्धा प्रारब्धात येऊ शकतो. लोभ हा प्रमाणात असावा, गरजेपुरता असावा. धनाचा लोभ करून वाममार्गाने कमावलेल्या धनाला चोरापासून भीती असते. धनलोभामुळे संचित केलेले धन दरोडेखोर लुटून नेऊ शकतात. त्यामुळे वेळप्रसंगी आपला जीवसुद्धा धोक्यात येऊ शकतो. अन् त्यामुळे आपोआप शोक निर्माण होतो..

धनाप्रमाणेच कोणत्याच बाबतीत हावरटपणा करू नका. ''अतिखाणे, अतिझोप, अतिआळस, अति स्वार्थीपणा, मानसिक व शारीरिक स्वास्थ्य बिघडवण्याचे कार्य करतात अन् त्यामुळे विनाकारण शोक निर्माण होतो. क्वचित प्रसंगी शारीरिक व्याधी निर्माण होतात. ज्या व्याधींचा परिणाम क्लेशदायक ठरू शकतो. म्हणून लोभ करा पण त्याचा अतिरेक होणार नाही, त्यापासून आपले नुकसान होणार नाही, याची काळजी घ्या. कमावलेले धन, कसे सांभाळावे या विचारात स्वत:चे मनस्वास्थ्य ढासळणार नाही, याची काळजी घ्या.

त्याचबरोबर आयुष्यात अनावश्यक काळजी करू नका. माझ्यानंतर माझ्या कुटुंबाचे काय होईल, त्यांच्यासाठी मी कमावलेला पैसा त्यांना पुरेल काय, आपल्या इस्टेटीची व धनाची ते योग्य प्रकारे काळजी घेतील काय, आपल्या भावी पिढीचे भविष्यात काय होईल, आपल्या माघारी आपल्या पत्नीस ते योग्यप्रकारे वागवतील काय? आपण कमावलेली संपत्ती ते वाममार्गाने खर्च तर करणार नाही ना? या अशा अनावश्यक काळजीच्या फेऱ्यात स्वत:ला गुंतवून घेऊ नका, त्यांची जबाबदारी त्यांच्यावर सोपवा.

अतिकाळजी करणे म्हणजे स्वत:चे मनस्वास्थ्य बिघडवणे होय. अतिकाळजीमुळे भविष्यात निद्रानाशाची व्याधी निर्माण होऊ शकते. अन्नपाणी गोड लागत नाही. आपल्यानंतर आपल्या संततीचे व कुटुंबाचे काय होईल, त्यांना दररोज पोटभर अन्न मिळेल काय या व्यर्थ चिंता करणे म्हणजे वेडाचे लक्षण समजावे. अन् वेळीच सावध होऊन जे होईल ते होईल, ज्याचे तो बघून घेईल यानुसार वागण्याचा प्रयत्न करावा व निश्चित व्हावे.

मनात नेहमी सडिर असावे, माझ्यानंतर माझी संतती व कुटुंब माझ्यापेक्षा उत्तम रितीने घरगृहस्थी संगोपन, घरातील सर्व सभासदात एकोपा राहील, आपल्यानंतर या घरात येणाऱ्या जाणाऱ्यांचे आजच्या परिस्थितीनुसारच स्वागत होईल. प्रत्येकजण सलोख्याने नांदेल, एकमेकाबद्दल कुटुंबात सर्वांच्या मनात लकीची भावना कायम राहील. घरात समंजसपणाचे आपुलकीचे वातावरण राहील. आपण केलेल्या योग्य संस्कारानुसारच घराचा कारभार सुरू राहील, ही भावना सदैव मनात ठेवून जगण्याचा प्रयत्न करावा..

भविष्यात सर्वांचेच भले होणार हे विचार मनात ठेवून उर्वरित आयुष्य आनंदात व्यतीत करा. व्यर्थ काळजी करू नका. सकारात्मक भावना मनात ठेवून जगा. आपल्या माघारी कुणाचे काय होईल याची काळजी करू नका, जे आजपर्यंत होते ते चांगलेच होते व पुढे जे काही घडणार ते सुद्धा चांगलेच घडणार या विचाराने जगा.

आपल्या कुटुंबावर व संततीवर विश्वास ठेवा. आपण कुणाचे अहित केले नाही मग आपल्या माघारी आपल्या कुटुंबाचेसुद्धा अहित होणार नाही या विश्वासावर जगा, पण जगताना स्वत: आदर्श निर्माण करा. तो म्हणजे अति लोभ करू नका, कुणाचे धन लुबाडू नका, कोणत्याच गोष्टीचा अतिरेक करू नका. हाच आदर्श आपल्या संतती समोर ठेवा.

अतिलोभामुळे नुकसान होते. त्यामुळे शोक प्राप्त होतो अन् अती काळजीमुळे मनस्वास्थ्य बिघडते, जे शरीरासाठी हानिकारक ठरू शकते. म्हणून अतिलोभ व अतिकाळजी या दुर्गुणांपासून नेहमीच दूर राहावे हेच उत्तम. या दोन दुर्गुणांपासून दूर राहिल्यास आयु आरोग्य, ऐश्वर्य, सुख समृद्धी, समाधान या गोष्टींचा लाभ मिळू शकतो अन् जीवन सुखकर बनू शकते. म्हटले आहे- म्हणून संतांनी अति लोभ हा दु:ख शोकास मूळ । अति काळजी टाळणे हेही खूळ ।। सदा चित्त ते सडिरे असावे । प्रमाणामध्ये सर्व काही असावे ।

लेखक:-
जगदिश वांदिले सर
दैनिक जनप्रभात तालुका प्रतिनिधी
अमोल झाडे समुद्रपुर

सामाजिक संघर्ष राष्ट्रहिताला घातक...!
(विचारमंथन)

सामाजिक, धार्मिक आणि वांशिक संघर्ष यातून निर्माण होणारा दहशतवाद हे भारतीय लोकशाही समोरील सर्वात मोठे आव्हान आहे, यामध्ये तेढ वाढल्यास संपूर्ण सामाजिक स्थैर्य नाहीसे होऊन लोक हवालदिल व बेचैन होतात, आणि यामुळे राष्ट्रहिताला या गोष्टी बाधक ठरतात लोक गैरमार्गाचा वापर करतात, अल्पसंख्यांक असणारा समाज भयभीत होतो. एकमेकांवरील विश्वास राहत नाही. लोकांच्या मनात असमाधानाची भावना निर्माण होते या सर्व गोष्टी राष्ट्रहिताला घातक व बाधक ठरतात असे मला वाटते

माणूस हा समूहात राहणारा प्राणी आहे. ज्यावेळेस समाजात प्रतिकूल परिस्थिती निर्माण होते, तेव्हा समाजातील वेगवेगळ्या घटका घटकांमध्ये सामाजिक संघर्ष उद्भवतात आणि त्याची परिणीती राष्ट्रहिताला बाधक ठरू शकते,

म्हणून सामाजिक संघर्ष समोपचाराने मिटविलेले चांगले असतात. नाही तर सतत एकमेंकाविषयी असणारा सामाजिक द्वेष, सुडाने पेटून उठतो व तो वाईट कृत्याच्या पाठीमागे धावतो हे होऊ नये म्हणून हा लेखन प्रपंच*.....

वैदिक काळापासून समाजामध्ये चार वर्ण मानले गेले ते चार वर्ण एकमेकांच्या सोबतीने राहू लागले. काही लोक निरक्षर असल्यामुळे उच्चवर्णीयांची मक्तेदारी सांभाळून जीवन जगू लागले, व सेवा करत असत, नंतर काळ बदलत गेला. इंग्रजांनी भारतावर १५० वर्ष राज्य केले. त्यामुळे प्रत्येक जातीला आपले कार्य काय आहे? हे समजू लागले इंग्रजांनी भारतीय लोकांना कारकूनी शिक्षण दिले, त्यातून कारकून वर्ग तयार झाला आणि स्व चा अभिमान जागृत झाला, इतर समाज आपणास कमी लेखतात याची जाणीव होऊ लागली या देशासाठी प्रत्येकानी खारीचा वाटा उचलला, काहींनी देशासाठी बलिदान देऊन जीवन संपवले, तेव्हा आपल्या

भारताला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले, देश सार्वभौमत्व झाला, आपले राष्ट्रगीत,गायले जाऊ लागले, चलन तयार झाले, तिरंगा झेंडा फडकू लागला, देशाला सर्वधर्मसमभावाचा दर्जा देण्यात आला प्रत्येक व्यक्ती जन्मताच स्वतंत्र आहे याची कल्पना देण्यात आली, आणि २६ जानेवारी १९५० रोजी आपला देश प्रजासत्ताक बनला, १९५२ पासून देशात सार्वत्रिक निवडणुका सुरू झाल्या आणि तेव्हापासूनच देशातल्या देशात अंतर्गत हेवेदावे होऊ लागले. आणि पुढे भारतातील वेगवेगळ्या राज्यात सीमारेषेवरून वादंग निर्माण होऊ लागले, याचा परिणाम सामाजिक संघर्षात होऊ लागला, प्रत्येक समाजाला आपण इतरापेक्षा मोठे आहोत असे वाटू लागले ,त्यातून जमातवाद, वसाहतवाद, दहशतवाद ,सीमावाद, नक्षलवाद,उदयाला आला आणि त्याचे समाजावर विपरीत परिणाम होऊ लागले. आज गावात,शहरात समाजात लोक अनेक झेंडे घेऊन फिरताना दिसत आहेत. आपला झेंडा बघून लोक एकत्रित येत आहेत, इतर लोक बाजूला होत आहेत, त्यामुळे सामाजिक व राजकीय दरी निर्माण होत आहे

आपण शाळेत असताना फक्त आपणाला तिरंगा झेंडा एवढाच माहिती होता, केसरी रंग शौर्याचा पांढरा रंग शांततेचा आणि हिरवा रंग समृद्धीचा हे आपल्याला शाळेत शिकविले गेले ते आजही आम्ही अभिमानाने सांगतो आणि सांगतच राहणार आहोत,

पण आज परिस्थिती बदलली कोणता झेंडा हाती घेऊ असे म्हणायची वेळ आली आहे, त्यामुळे समाजानुसार झेंडे तयार झाले आहेत, अल्पसंख्याकांची घुसमट होत आहे, समाजात तेढ निर्माण झाल्यासारखे वातावरण तयार झाले. यामुळे राष्ट्रहिताला बाधा निर्माण होत आहे, प्रभूची लेकरे सारी हे गीत योग्य आहे की नाही याबद्दल आता विचार करावा लागेल.

यापूर्वी अठरा आलूतेदार आणि बारा बलुतेदार मिळून सर्वांनी गुण्यागोविंदाने या भारतात जीवन जगत असताना झेंडे संस्कृती मध्येच उदयाला आली. बलसागर भारत होवो। विश्वात शोभूनी राहो असे अभिमानाने गीत गात होतो , सर्वजण आपले मित्र आहेत एकमेकांच्या ताटातून आपण जेवण करत होतो, त्यावेळेस सामाजिक एकात्मता खरोखरच चांगली होती, लोक निरक्षर असले तरी मनाने चांगले होते हा आपलाच आहे अशी भावना त्यांच्यावर होती. आता अलीकडच्या काळात लोक सुशिक्षित झाली आणि मनाने दूर झाली. एकमेकाबद्दल आपुलकी, माया, प्रेम, दया, ममता थोडी थोडी कमी होत आहे, हे सर्व अनुभवानी सांगता येते, परंतु सध्या जातीय संघर्ष पेटत आहेत. त्यातून समाज भयभीत होत आहे, राष्ट्राची बांधणी सामाजिक एकात्मतेतून झालेली असते, हाताची पाच बोटं एकत्रित आली की वज्रमूठ तयार होते. एक बोट काहीही करू शकत नाही ,तसेच सर्व समाजाला घेऊन चालावे लागेल,

त्यांच्या त्यांच्यात संघर्ष होणार नाहीत याची जबाबदारी घ्यावी लागेल. राष्ट्र, राष्ट्रवाद, स्वाभिमान प्रत्येक नागरिकात ठसठसून भरला पाहिजे. म्हणूनच आपण भारत माझा देश आहे.

म्हणून आपण एकत्रित येतो.

सर्व समाजातून लोक पुढे येतात. कोणी शेतकरी ,सैनिक, मंत्री ,शिक्षक व्यावसायिक, डॉक्टर, वकील ,सनदी अधिकारी, कवी ,लेखक, साहित्यिक,

शास्त्रज्ञ अनेक समाजातून पुढे आलेले असतात, ते राष्ट्राची सेवा करतात म्हणून राष्ट्र हे बलशाली व कणखर होते .पण सामाजिक संघर्षामुळे घात होतो तो राष्ट्रहिताला अडसर ठरतो त्यामुळे व्यक्तीचे मने क्लुषीत होतात ते एकमेकाबद्दल तिरस्कार करतात. याचा फायदा आपले अप्रत्यक्ष असणारे शत्रू उठवतात, त्यातून राष्ट्राची हानी होते आपले राष्ट्र कमकुवत झाल्यानंतर इतर राष्ट्र आपल्या देशावर कधीही हल्ला करतील याचा नियम नसतो ,

फोडा आणि राज्य करा

या नीतीचा ते अवलंब करतात म्हणून सर्वधर्मसमभावाने जातीय सलोखा ठेवून चालावे असे मला वाटते. जसे सर्व जाती धर्मातील संतांनी देश व समाज जोडण्याचे फार मोठे कार्य केले, त्यामुळे आपली सांप्रदायिकता संपूर्ण समाजाला एकत्रित करते, विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।।भेदाभेद भ्रम अमंगळ।।

असे त्यांनी म्हटले आहे,

साने गुरूजींनी खरा तो एकची धर्म म्हणून सर्वांना एकत्रित केले.

संत ज्ञानेश्वरांनी हे विश्वचि माझे घर असे म्हटले आहे। त्यातून एकात्मतेची भावना बळावते तुच्छता दूर पळून जाते, अंत:करण एकत्रित येते, छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जमातींना एकत्रित करून हिंदवी स्वराज्य निर्माण केले, छत्रपती संभाजी महाराजांनी या स्वराज्यासाठी आपले बलिदान दिले, हजारो क्रांतिकारकांना इंग्रजांनी फाशी दिली ते त्यांनी हसतमुखाने स्वीकारली ते फक्त या देशासाठी सर्व जण एकत्रित राहावे, संत गाडगे महाराजांनी सर्व समाजासाठी धर्मशाळा बांधल्या

,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांना समानतेचा संदेश दिला ,पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांनी लाखो मंदिरांचा जीर्णो द्धार केला, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी या रे या रे लहान थोर म्हणून सर्वांना एकत्रित केले, परंतु आज समाजात एकमेंका विषयी तिरस्कार, द्वेष,सूड ,कपट निर्माण होत आहे , झेंडा संस्कृती उदयाला आल्यामुळे भविष्यात काय होईल? आता हे वारे कोणत्याही दिशेला वाहत आहेत, विकृती वाढली आहे, दिवसा ढवळ्या एकमेकांचे खून केले जात आहेत, दरोडे टाकले जात आहेत, बलात्कार, अत्याचार,चोरी या गोष्टी समाजात घडत आहेत, अनेक जणांच्या ठरवून हत्या केल्या जात आहेत, यामुळे समाज दुभंगला आहे सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे. धार्मिक संघर्ष निर्माण झाला तर लोकशाहीला धोका निर्माण होतो,

आपले स्वातंत्र्य, समता ,बंधुता,आपली लोकशाही, आपली गाभाभूत घटके ,नैतिक,सामाजिक मूल्ये समाजात रुजली पाहिजेत तेव्हाच आपण एक आहोत, साखरेचा कण जसा दुधाशी एकरूप होतो, तसे व्यक्ती राष्ट्राशी एकरूप झाल्याशिवाय राष्ट्रबांधणी मजबूत होऊ शकत नाही. त्यामुळे सर्वांनी एकत्रित येऊन आपला देश मोठा करावा. महासत्ता होण्यासाठी राष्ट्रबळ वाढवण्यासाठी समाजामध्ये हेवेदावे, तेढ, द्वेष नाहीसे करावे लागतात ,आणि व्यक्ती हितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य द्यावे, तेव्हा सारे जहाँ से अच्छा। हिन्दोस्ताँ हमारा।। असे आपल्याला म्हणता येईल.

प्रा. बरसमवाड विठ्ठल गणपत
अध्यक्ष: विठूमाऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी, ता. मुखेड

गर्जा महाराष्ट्र माझा व भारतीय सणांनी गुंजले सरस्वती इन्स्टिट्यूट सरस्वती इन्स्टिट्यूट संस्काराचे माहेरघर - डॉ नारायण मेहेरे

पान १ वरुन कॉलेज पाटनसावंगीच्या मुख्याध्यापिका सौ ममता मिश्रा ,सरस्वती भवन कॉन्व्हेन्ट च्या मुख्याध्यापिका सौ चंचल चौबे,सरस्वती भवन हायस्कूलच्या मुख्याध्यापिका निशा फिलिप्स, सरस्वती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ ओम चौधरी, सरस्वती गर्ल्स कॉलेजच्या प्रभारी प्रा.कांचन तिवारी उपस्थित होत्या . तर दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदवीधर अधिसभेवर असलेले श्री विष्णूची चांगदे , श्री चिंतामणजी वंजारी सचिव विभागीय मंडळ नागपूर, डॉ गजानन पोलंवार असिस्टंट प्रोफेसर हिंदी विभाग प्रमुख तायवाडे महाविद्यालय कोराडी धनंजय साखरकर टाइम्स न्यूज जिल्हा प्रतिनिधी चंद्रपूर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शाहू महाराज तसेच सरस्वती मातेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावर्षीची सरस्वती इन्स्टिट्यूट ची संकल्पना ही वार्षिक स्नेहसंमेलनाकरिता गर्जा महाराष्ट्र माझा व भारतीय सण अशी होती उपस्थित मान्यवर स्नेहसंमेलनातील संस्कृतीचे जतन बघून अगदी भारावून गेले . डॉ देवेंद्र भोंगाडे सर यांनी डॉक्टर मारोती वाघ सर सौ लता वाघ मॅडम या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा वारसा समोर नेत असल्याचे व संस्कार वार्षिक स्नेहसंमेलन घेऊन विद्यार्थ्यांमधील कलागुंनाणा वाव देण्याकरिता मोठ्या प्रमाणात मंच देत असल्याचे बघून आनंद होत असल्याचे व्यक्त केले. डॉ नारायण मेहरे सर यांनी सरस्वती इन्स्टिट्यूट म्हणजे संस्काराचे माहेरघर असल्याचे तसेच ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न हे इन्स्टिट्यूट करत असल्याचे सांगितले. मा.चिंतामणजी वंजारी सचिव विभागीय मंडळ नागपूर यांनी पालक वर्ग यांना संबोधित करीत असताना स्वतःच्या उदाहरणातून विद्यार्थ्यांना कसे अभ्यासूवृत्तीकडे वळवावे त्याचबरोबर अभ्यासाशिवाय पर्याय नाही तसेच सर्वांगीण विकासाकरिता अशा स्नेहसंमेलनाची गरज असल्याचे सांगितले. डॉ. विष्णूजी चांगदे यांनी सरस्वती इन्स्टिट्यूट चे वार्षिक स्नेहसंमेलन हे संस्कारमय संस्कृतीचे जतन करीत आहे असे म्हटले. डॉ. गजानन पोलनवार यांनी विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनातून व्यक्तिमत्व विकास घडतो म्हणून अशा सृजनशील कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी सरस्वती इन्स्टिट्यूटने करून दिली त्याबद्दल सरस्वती इन्स्टिट्यूट चे कौतुक केले. डॉ हेडाऊ सर यांनी विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनाकरिता शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या संचालिका प्राचार्य सौ.लता वाघ मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती बरोबर व्यक्तिमत्व विकासाची प्रगती या सांस्कृतिक कार्यक्रमातून करावी असे आवाहन केले. अध्यक्ष स्थानावरून बोलताना संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. मारोती वाघ यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्र, क्रीडा क्षेत्रात जशी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली तसेच सांस्कृतिक क्षेत्रात ही झेप घ्यावी अशी इच्छा व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ अर्चना पत्की यांनी अहवाल वाचन केले तसेच सरस्वती भवन कॉलनी यांच्या मुख्याध्यापिका सौ चंचल चौबे मॅडम यांनी अहवाल वाचन केले सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका डॉ. सुवर्णा जांभूळकर यांनी अहवाल वाचन केले. सरस्वती भवन कॉन्व्हेंट च्या क्रीडा विभागाचे अहवालवाचन पुनम वाघ मॅडम यांनी केले. कार्यक्रमात दरम्यान डॉक्टर सत्यवान मेश्राम माजी प्राचार्य यांच्या आई गंगाबाई शंकरजी मेश्राम यांच्या स्मृतिप्रित्यर्थ एक हजार रुपयाचे बक्षीस वर्ग नववीची आरती विष्णूजी सोनबावणे हिला मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. मुक्त विद्यापीठ एम कॉम चा विद्यार्थी देवांशू देवेंद्र दोडके नाशिक मुक्त विद्यापीठातून प्रथम आल्याबद्दल त्याचे व त्याचे वडील अभिनेता देवेंद्र दोडके व आई दिपाली दोडके यांचा सत्कार श्री नारायणजी मेरे संचालक मुक्त विद्यापीठ नागपूर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सायली लाखे, डॉ. सुवर्णा जांभुळकर ,पूजा सिंग मॅडम, मानसी पटेल मॅडम, वर्ग १२ वी च्या विद्यार्थिनी स्नेहा खोकले, तनुश्री कांबडी वर्ग १० वी च्या विद्यार्थिनी भाग्यश्री शुक्ला, प्राची कलमखेडे,सिमरन यादव यांनी केले. कार्यक्रमात नर्सरी ते पदवीधर पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता सर्व शिक्षक, प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले

सांप्रदायिक संस्कृती मनामनामध्ये रुजली पाहिजे : ना. संजय बनसोडे

पान १ वरुन

लातूरचे खासदार सुधाकर श्रृंगारे, माजी जि.प. सभापती बापूराव राठोड, सरपंच विमलबाई चिखले, शेल्हाळचे सुपुत्र डॉ.अनिल कांबळे, तोंडचिरचे सरपंच सुदर्शन पाटील, तहसीलदार विकास बिरादार, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, भाजपा तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, भगवानराव पाटील तळेगावकर, सुरेश लांडगे, किरण लांडगे, उमाकांत तपशाळे, विवेक सुकणे, सायस दराडे, उदय मुंडकर, भिम लांडगे, वसंत पाटील, दत्ता पाटील आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, मागील ५०० वर्षापासुनचे आपल्या सर्व भारतीयांचे स्वप्न होते की, प्रभु श्रीराम यांचे भव्य दिव्य मंदिर आयोध्येत उभारावे, ही आपली ईच्छा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २२ जानेवारीला पूर्ण केली. त्यांच्या नेतृत्वाखाली आपण सर्व जाती धर्माला सोबत घेवुन विकास करणार असुन आपला देश २०४७ पर्यंत विकसीत झाला पाहिजे व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टीला आपण साथ द्यावी. असे आवाहन ना.बनसोडे यांनी केले. यापुढे आपण सर्वांनी धार्मिक कार्यक्रमाला बळ देवुन पुढच्या पिढीला चांगले संस्कार द्या. या स्पर्धेसाठी २५ जिल्ह्यातील वारकरी संप्रदाय सहभागी झाले आहेत. राष्ट्रीय एकात्मता जपण्याचे काम वारकरी सांप्रदायाने केले. मानव सेवा केली तर ती ईश्वर सेवा केल्यासारखी आहे असे ही मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत जाधव यांनी केले. कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविक भक्त, वारकरी मंडळी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माझे पद माझी जबाबदारी ! महिला सक्षम तर देश सक्षम !!



दै.जनप्रभात
भुगांव :-नंदू कोल्हे

प्रा. अवंतिकाताई रमेश लेकुरवाळे यांच्या विशेष प्रयत्नांनी महिला बालकल्याण विभाग जिल्हा परिषद नागपूर तर्फे एकात्मिक बाल विकास प्रकल्प मौदा अंतर्गत आयोजित मौदा तालुक्यातील महिलांना जेंडर, आरोग्य व कायदेविषयक प्रशिक्षण आणि विशेष म्हणजे महिलांच्या खास मनोरंजनासाठी भव्य महिला मेळावा मौदा येथे आयोजित केला होता. प्रसंगी माजी मंत्री श्री. सुनीलजी केदार साहेब, श्री. सुरेशजी भोयर माजी अध्यक्ष जि.प. नागपूर, माजी अध्यक्ष सौ. रश्मीताई बर्वे, प्रा. अवंतिकाताई रमेश लेकुरवाळे सभापती म.बा. क. समिती जि.प. नागपूर, माजी उपाध्यक्ष श्री.तापेश्वरजी वैद्य, सौ. राधाताई अग्रवाल म.बा. क समिती सदस्य, जि.प.सदस्य सौ.शालिनीताई देशमुख,जि.प.सदस्य श्री. योगेशजी देशमुख, आणि पंचायत समितीचे सन्माननीय सदस्य व मोठ्या संख्येने महिला सरपंच उपस्थित होत्या. महिला मेळाव्यातील महिलांनी विविध मैदानी स्पर्धांचा व नृत्य स्पर्धांचा मनसोक्त आनंद लुटला महिला सुरक्षा व जेंडर प्रशिक्षण यावर वैचारिक प्रशिक्षण देखील झाले. तीन हजाराहून जास्त महिलांनी या मेळाव्याचा आनंद घेतलां. दरवर्षी अश्याप्रकारचे महिला मेळावे घेऊन महिलांसाठी आनंदाचे क्षण उपलब्ध करून द्यावे,आम्ही प्रत्येक महिला मेळाव्याला येवू,असे उपस्थित महिलांचे चेहऱ्यावरचे आनंदाचे सुख दिसून आले. एकात्मिक बालविकास प्रकल्प यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

नरेंद्र गुळघाने यांना राज्यस्तरीय काव्य भूषण पुरस्कार

पान १ वरुन सामाजिक ,आध्यात्मिक ,व्यक्ती वर्णन २५३ लेख , रवी सूर्य भास्कर वर १८३ कविता लेखन, पारिजात फुललेला १५७ लेख इत्यादी साहित्य रचना अनेक मासिक दैनिक,त्रैमासिक ,दिवाळी विशेषांक यामध्ये प्रकाशित झालेल्या आहेत .त्याचप्रमाणे फूटपाट, रविकिरण ,आणि इतर ९ काव्य संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. पारिजात फुललेला ,सामाजिक ,दलित, आंबेडकरी ,आदिवासी ,प्रेम, निसर्ग ,काव्य लेखन या साहित्याचे लेखनात ते अग्रेसर आहे '' शर्यत रे अपुली '' विशुभाऊ बापट यांचे प्रसारित काव्य भागात कवी म्हणून सहभागी झाले असून त्याचे एकूण १८ भाग सह्याद्री वाहिनीवर प्रसारित झालेले आहे, परीक्षक, गीतकार, संगीतकार ,यशवंत देव सर ,साहित्यिक प्राध्यापक नंदा केशव मेश्राम ,प्राध्यापक कविवर्य विठ्ठल वाघ, पकविवर्य प्राध्यापक ज्ञानेश वाकुडकर सर यांचा सहभाग होता. राष्ट्रपती यांच्या हस्ते निर्मल ग्राम पुरस्कार २ वेळा, वॉटर कप पुरस्कार आमिर खान आणि मुख्यमंत्री यांचे हस्ते दोन वेळा, सुरेश भट गजल पुरस्कार ..सुरेश भट गजर प्रतिष्ठान अमरावती कडून, महाराष्ट्र राज्य साहित्य काव्य कला शिरोमणी पुरस्कार महाराष्ट्र राज्य निनाद साहित्य अकादमी मुख्यालय आष्टी यांचे कडून अशा अनेकविध पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा पिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242

चंद्रपाल चौकसे लोकसेवा प्रतिष्ठान रामधाम तर्फे ह.भ.प. येनिरामजी भट महाराज यांचे सन्मानचिन्ह देऊन सत्कार

दै,जनप्रभात
(जयश्री मेंघरे / वैद्य)



रामटेक :- शिरपूर येथील हनुमान देवस्थान पंचकमिटी शिरपूर येथे संगीतमय श्री शिव महापुराण कथा व रुद्राक्ष ज्ञानयज्ञ कार्यक्रमात रामटेक विधानसभा क्षेत्राचे काँग्रेस नेते मा.श्री. चंद्रपालजी चोकसे (अध्यक्ष राष्ट्रीय पंचायती राज ग्रामपंचायत सरपंच संघटन महाराष्ट्र राज्य/ पर्यटक मित्र रामटेक) यांनी भेट दिली व श्री. चंद्रपाल चौकसे लोकसेवा प्रतिष्ठान रामधाम तर्फे ह.भ.प. येनिरामजी भट महाराज यांचे सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आमदार श्री. डी. मल्लिकार्जुन रेड्डी, डॉ. राजेशजी ठाकरे, श्री. अमित बादुले (ग्रा. पं. सदस्य), सौ. सुषमाताई इनवाते (ग्रा.पं. सदस्या), श्री. दामोदरजी गाउत्रे (अध्यक्ष, हनुमान पंचकमेटी शिरपूर), श्री. गुलाबजी निकुरे (उपाध्यक्ष, हनुमान पंचकमेटी शिरपूर), श्री. रतनजी चांदेकर, श्री. गंगाधरजी गाउत्रे, श्री. नामदेवजी निकुरे, श्री. रामकृष्णाजी भोंदे, श्री. गजाननजी इडपाचे, श्री. भगवानजी ठाकरे, श्री. शामुजी चौधरी, श्री. किशोरजी मांदाळे व समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

****

३ दिवसीय जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.जनप्रभात
जयश्री मेंघरे /प्रतिनिधी



करंभाड :- येथे शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद नागपूर मार्फत ३ दिवसीय जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव २०२३-२०२४ चे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. क्रीडा स्पर्धेतील खेळाडूंना बक्षीस वितरण सोहळ्याला प्रमुख्याने उपस्थित कु.कुंदाताई राऊत (उपाध्यक्ष जिल्हा परिषद नागपूर) श्री.राजकुमारजी कुसुंबे (सभापती जिल्हा परिषद नागपूर) श्री.दुधरामजी सव्वालाखे (जिल्हा परिषद सदस्य नगरधन भंडारबोडी सर्कल) अर्चनाताई भोयर (जी.प.सदस्या नागपूर) मंगलाताई निंबोने (सभापती पं.स.पारशिवणी) करुणाताई भोवते (उपसभापती पं.स.पारशिवणी) मीनाताई कावळे , श्रीधरजी झाडे , कुंभार मॅडम (तालुका गट शिक्षण अधिकारी) तसेच रामटेक , सावनेर व पारशिवणी तालुक्यातील सर्व पंच व इतर मान्यवर , गावकरी नागरिक , शिक्षक वर्ग व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

श्रावस्ती वाघमारेला नॅशनल अबॅकस स्पर्धत सुवर्ण पदकं

दै.जनप्रभात
जीवन मोहिते /प्रतिनिधी



सातारा ;-वळसे तालुका सातारा इयत्ता तिसरी मध्ये शिकत असलेली श्रावस्ती वाघमारे हिने नॅशनल अबॅकस स्पर्ध मध्ये भाग घेऊन आठ मिनिटात शंभर मार्क पेपर सोडऊन ९६%मार्क मिळवल्या बध्दल नॅशनल अबॅकस कॉम्पीटीशन अवॉर्डफॉर विनिंग अबॅकस कॉम्पीटीशन लेवल अ ग्रुप मिळवला त्या बध्दल वडील मंगेश वाघमारे आई रोहीणीताई वाघमारे आजोबा महादेव वाघमारे सुदाम रोकडे आजी सौ लता वाघमारे सौ संजना वाघमारे मामा समाजरत्न राहुल रोकडे पुजा रोकडे संघर्ष रोकडे शिक्षक आदीनी अभिनंदन केले पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ऑरेंजसिटी कॉन्व्हेंट येथे स्नेहसंमेलन.

विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी घेतला सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद.

दै,जनप्रभात
नरखेड प्रतिनिधी



(ता ४)शिंदे शिक्षण डरा संचालित ऑरेंजसिटी कॉन्व्हेंट दोन दिवशीय स्नेहसंमेलन पार पडले.या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सतीश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती राजेंद्र हरणे हे होते यावेळी मंचकावर राजू गुरव अंजली शिंदे, किरण गोडबोले, सीमा बोदड,सतीश रेवतकर, डॉजयंत जवंजाळ, रवींद्र वैद्य मधुकरराव बारोकर वसंतराव पानतावणे,मधुकरराव ठाकरे,रमेश रेवतकर, प्रभू गायकवाड, गोपाल टेकाळे, मयूर ठाकरे,राहुल दळवी, मीनाक्षी मडके,रत्नाकर मडके, चंचला पंत,शंकराव फुले,अरविंद गोतमारे,मनीष दुर्गे, कॉन्व्हेंटचे प्राचार्य भारती झामरे, अविनाश गजबे याची उपस्थिती होती. यावेळी विज्ञान प्रदर्शनी, रांगोळी स्पर्धा, वेशभूषा,, महाराष्ट्रीन थाळी, हसतलेखन स्पर्धा, ड्रॉईंग स्पर्धेचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते पार पडले. सर्व विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेतला. स्नेहसंमेलनाच्या दुसऱ्या दिवशी विजयी स्पर्धकांना मान्यवराच्या हस्ते बक्षीस वितरण करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारती झांमरे, अविनाश गजबे यांनी केले सूत्रसंचालन प्रवीण वासाडे,आभार अनुराधा काळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता हेमा मोहोड ,प्रशांत ढोके,भारती मडके, रुपेश दाढे,भावेश मडके, हरिभाऊ उईके,पुष्पा गुरुमुळे,रेखा कठाणे, कविता कांबळे, चित्रा चरडे, रितू सोनटक्के, संध्या खंडारे, चंदा क्षीरसागर, कल्याणी रेवतकर, प्रिया उबणारे, विवेक लक्षणकर, मनीषा पोतदार, रजनी दातीर, भूमिका गेडाम, उज्वला जिचकार ,शिवानी वानोडे ,प्रणाली कडमधाड भाजीखाये यांनी परिश्रम घेतले.

सालई हिवरा शाळेला चटई भेट



दै,जनप्रभात जयश्री मेंघरे /वैद्य.

रामटेक ;- पंचायत समिती रामटेक अंतर्गत असलेल्या जि.प. शाळा सालई हिवरा कें हिवराबाजार शाळेला रामटेक येथील समाजसेवक गोपी कोल्हेपरा यांचे कडून शालेय पोषण आहारासाठी भोजनपट्ट्या भेट देण्यात आल्या.याप्रसंगी गोपी कोल्हेपरा यांच्या सोबत ज्योती कोल्हेपरा यांची उपस्थिती लाभली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत मेहर,अशोक हांडे,राजेंद्र खडसे,विश्वनाथ दुंडे,माजी नगरसेविका अनिता टेटवार,मुख्याध्यापक एन एस इंगळकर उपस्थित होते.

दृष्टी फाउंडेशनच्या उपक्रमाने महिलांमध्ये उत्साह

दै.जनप्रभात
प्रशांत पवार/प्रतिनिधी

काटोल ;- रविवारला काटोल तालुक्यातील मेटपांजरा व हातला ह्या गावामध्ये दृष्टी फाउंडेशन अंतर्गत राबवत असलेल्या स्वावलंबन प्रकल्पा तर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला दृष्टी फाउंडेशन चे को-फाउंडर श्री. सत्यन मिश्रा तसेच महाराष्ट्र हेड श्री. तरुण आर्या व नागपूर टीम संचालक श्री. विशाल लाभे यांनी उपस्थिती लावून गावातील विकास कामांचा आढावा घेतला. या कार्यक्रमांमध्ये गावातील महिला वैभवी गटांनी तयार केलेल्या त्यांच्या उत्पादनाचे उत्तम प्रदर्शन केले. दृष्टी फाउंडेशन अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या स्वावलंबन प्रकल्पा मार्फत ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराचे प्रशिक्षण देऊन महिला सक्षमीकरणासाठी उपक्रम राबविला जातो. ह्या कार्यक्रमाला दोन्ही गावातील शेतकरी, महिला, जनप्रतिनिधी आणि प्रतिष्ठित व्यक्तीनी हजेरी लावून शोभा वाढवली.



३ दिवसीय जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.जनप्रभात
जयश्री मेंघरे/प्रतिनिधी

रामटेक :- करंभाड येथे शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद नागपूर मार्फत ३ दिवसीय जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव २०२३-२०२४ चे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. क्रीडा स्पर्धेतील खेळाडूंना बक्षीस वितरण सोहळ्याला प्रमुख्याने उपस्थित कु.कुंदाताई राऊत (उपाध्यक्ष जिल्हा परिषद नागपूर) श्री.राजकुमारजी कुसुंबे (सभापती जिल्हा परिषद नागपूर) श्री.दुधरामजी सव्वालाखे (जिल्हा परिषद सदस्य नगरधन भंडारबोडी सर्कल) अर्चनाताई भोयर (जी.प.सदस्या नागपूर) मंगलाताई निंबोने (सभापती पं.स.पारशिवणी) करुणाताई भोवते (उपसभापती पं.स.पारशिवणी) मीनाताई कावळे , श्रीधरजी झाडे , कुंभार मॅडम (तालुका गट शिक्षण अधिकारी) तसेच रामटेक , सावनेर व पारशिवणी तालुक्यातील सर्व पंच व इतर मान्यवर , गावकरी नागरिक . शिक्षक वर्ग व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.



केजाजी महाराज पुण्यतिथी

उत्सवानिमित्त भागवत ग्रंथाची मिरवणूक



दै,जनप्रभात
प्रशांत झाडे/प्रतिनिधी

सेलू - तालुक्यातील श्रीक्षेत्र घोराड येथील विठ्ठल रुक्मिणी देवस्थान मध्ये संत केजाजी महाराज पुण्यतिथी उत्सवानिमित्त शुक्रवारी सायंकाळी भागवत ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली येथे शुक्रवार पासून श्रीमद भागवत कथेला प्रांरभ झाला असून भागवताचार्य ह भ प संतोष महाराज ठाकरे हे भागवत कथेला संबोधित करीत आहे शुक्रवारी सायंकाळी वाजत गाजत विठ्ठल नामाचा जयघोष करीत भजनी मंडळीसह मंदीरातून निघालेली ही गावातील राजेंद्र वरटकर यांचे घरी गेल्यानंतर तेथून हा भागवत ग्रंथ विधीवत पूजा अर्चना करून मंदिरात आणल्या गेला त्यानंतर भागवत कथेला प्रांरभ करण्यात आला या मिवणुकीत भागवताचार्य ह भ प संतोष महाराज ठाकरे, मंदीर समितीचे पदाधिकारी, गावातील नागरिक तरूण मंडळी यांचा सहभाग होता ता.८ फेब्रुवारीला या श्रीमद भागवत कथेची समाप्ती होणार आहे या पुण्यतिथी उत्सवानिमित्त येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यामुळे गावातील वातावरण भक्तिमय झाले आहे दररोज सकाळी सहा वाजता होणार्या आरतीला तसेच ज्ञानेश्वरी पारायणाला महिला तथा पुरूषांची मोठी गर्दी असते दररोज पहाटे ग्रामस्वच्छता अभियान राबविले जात असून सकाळी मंदिर परिसर भाविकांचे गर्दीने फुलून जातो

****

वाळू माफिया विरुध्द देवळी पोलीसांची धडक कार्यवाही



दै.जनप्रभात
विनोद महाजन /प्रतिनिधी

देवळी :- दिनांक ०३/०२/२०२४ रोजी १८/३० वा. ते १९ / ३० वा. दरम्याण मौजा आपटी शिवारातील वर्धा नदीचे घाटावर रेती चोरी बाबत रेड केला असता १) प्रमोद इंदल भैसारे वय ३६ वर्ष, रा. इंदीरानगर नाचनगाव ता. देवळी २)आरीफ गुलाब खाँन पठाण वय ३५ वर्ष, रा. इंदीरानगर नाचनगाव ता. देवळी यांनी संगणमत करून वर्धा नदिचे पात्रातील आपटी घाटातुन अवैधरित्या रेतीचा उपसा करून विनापास परवाना रेती चोरून वाहतुक करीत असताना मौजी नाचनगाव येथे मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन एक ट्रॅक्टर व ट्राली तसेच १ ब्रास रेती असा एकुण जु. की. ७,५५,०००/- रू. चा माल जप्त करुन आरोपीतांन विरूध्द कलम ३७९,३४ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करून तपासात घेतला. सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. नरुल हसन सा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. सागर कवडे सा.,उपविभागीय पोलीस अधिकारी पुलगाव खझड राहुल चव्हाण सा. स.पो.नि.श्री मंगेश भोयर, यांचे मार्गदर्शनात पो. हवा. चंद्रशेखर चुटे, अमोल जिन्दे, रविंद्र जुगनाके, उमेश बेले, यांनी केली आहे

पुणे जिल्हा हिंदी अध्यापक संघाच्या उपाध्यक्षपदी श्री राजेंद्र सर्जेराव रणमोडे सर यांची निवड

दै.जनप्रभात
जीवन मोहिते/प्रतिनिधी



सातारा :- हिंदी पुणे जिल्हा हिंदी अध्यापक संघाच्या कार्यकारणीची सहविचार सभा घेण्यात आली या सभेत पुणे जिल्हा हिंदी अध्यापक संघाचे अध्यक्ष श्री विठ्ठलराव शिंदे यांनी लोकनेते शहाजीराव पाटील माध्यमिक विद्यालय बोराटवाडी तालुका इंदापूर जिल्हा पुणे चे सहशिक्षक व इंदापूर हिंदी अध्यापक संघाचे विद्यमान अध्यक्ष यांची पुणे जिल्हा हिंदी अध्यापक संघाच्या उपाध्यक्षपदी निवड केली.यावेळी महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक महामंडळ चे उपाध्यक्ष श्री ता का सूर्यवंशी , महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर कर्मचारी कार्याध्यक्ष श्री शिवाजी खांडेकर तसेच हिंदी भाषा विषय समिती सदस्या डॉ. रंजना पिंगळे ,माजी विशेष हिंदी भाषा अधिकारी बालभारती पुणे डॉ. अलका पोतदार ,महाराष्ट्र राज्य हिंदी शिक्षक महामंडळ सदस्य श्री उस्मान मुलाणी ,पुणे जिल्हा हिंदी अध्यापक संघाचे उपाध्यक्ष श्री गजानन गोसावी, सचिव सौ अनिता चौधरी, हिंदी जिल्हा समन्वयक श्री सुधाकर भोंग , इंदापूर हिंदी अध्यापक संघाचे सचिव श्री के डी भोंग उपस्थित होते.या निवडीबद्दल मा.मंत्री माननीय श्री हर्षवर्धन पाटील साहेब, निरा भिमाचे सहकारी कारखान्याचे संचालक माननीय श्री राजवर्धन पाटील ,तसेच ज्येष्ठ संचालक मा.श्री उदयसिंह पाटील उर्फ भैय्यासाहेब ,सचिव मा. श्री किरण काका पाटील ,उपाध्यक्ष मा.श्री मनोज पाटील ,व प्राचार्य श्री भीमराव आवारे सर यांनी रणमोडे सर यांचे अभिनंदन केले.

रामटेक नगरपरिषद अंतर्गत घनश्यामराव किंमतकर

सभागृह रामटेक येथे मकरसंक्रांत निमित्त आयोजित

हळदी कुंकू कार्यक्रमाला माजी मंत्री श्री.राजेंद्र मुळक यांची उपस्थिती



दैनिक जनप्रभात
जयश्री मेंघरे /प्रतिनिधी

रामटेक ;- आज दिनांक ०३/०२/२०२४ रोज शनिवारला रामटेक नगरपरिषद अंतर्गत घनश्यामराव किंमतकर सभागृह रामटेक येथे मकरसंक्रांत निमित्त रामटेक शहर व तालुका महिला काँग्रेस कमेटी तर्फे आयोजित हळदी कुंकू कार्यक्रमाला मा.श्री.राजेंद्रजी मुळक (माजी मंत्री तथा अध्यक्ष नागपुर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी) यांनी उपस्थित राहून सर्व महिला भगिनींशी संवाद साधला.यावेळी सौ. रश्मीताई बर्वे (माजी अध्यक्ष जि.प.नागपूर), श्रीमती शांताताई कुंमरे (सदस्य जि.प.. जयश्रीताई मेंघरे/ वैद्य अधिवक्ता व तसेच द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या राज्य महिला सचिव , नागपूर), सौ. कलाताई ठाकरे (माजी सभापती पं.स. रामटेक), सौ. शोभाताई राऊत (माजी नगराध्यक्ष रामटेक), सौ. आशाताई हांडे, सौ. अलकाताई सेलोकर (अध्यक्ष म.श.काँ. क. रामटेक),सौ. आम्रपालीताई भिवगडे (महासचिव ना.जि.म. ग्रा. काँ.क), कु श्रीमती कामिनीताई हटवार, सौ. पुष्पाताई बर्वे (माजी नगरसेवक), सौ. शुभांगीताई रामेलवार (माजी अध्यक्ष म.काँ.), सौ. कांचनमाला माकडे, सौ. बबीताताई कोठेकर, सौ. ममताताई राले, सौ. राजेश्रीताई कांबडी, सौ. सोनूताई होलगिरे, सौ. पल्लवीताई श्रीरामे,सौ. शारदाताई बर्वे, सौ. चंदाताई देवतळे, सौ. रत्नकलाताई लिल्हारे, सौ. शिल्पाताई नागपुरे, सौ. पुष्पाताई धोपटे, सौ. जयश्रीताई धुर्वे, सौ. अनिताताई जनबंधू, सौ. मीनाक्षीताई धमगाये, सौ. सुनीताताई धमगाये, सौ. अलकाताई वाडगे, सौ. भारतीताई गजभिये, सौ. अलकाताई मेश्राम, सौ. रियाताई महाजन, सौ. भूमिकाताई सहारे, सौ. विमलताई नागपुरे, सौ. कलावतीताई पडोळे, सौ. रंजनाताई मस्के, सौ. साक्षीताई घोडागाडे इत्यादी मान्यवर मंडळी व मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या.

शिवसेने चा प्रमुख पदाधिकारी यांची विशेष बैंटक

खासदार कृपाल तुमारे यांची प्रमुख उपस्थिती



दैं.जनप्रभात
(जयश्री मेंघरे / वैद्य)

रामटेक -लोकसभा रामटेक यांचा नागपुर येथील कार्यालयात शिवसेने चा प्रमुख पदाधिकारी यांची आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विशेष बैटक घेण्यात आली. या बैटकी मध्ये येणाऱ्या लोकसभा निवडणुकीला लक्षात घेता काही महत्वपूर्ण विषयावर चर्चा काण्यात आली. याप्रसंगी मा.खासदार श्री कृपाल जी तुमाने शिवसेना नागपुर जिल्हा प्रमुख संदीप जी इटकेलवार, बंडु जी तडवेकर, नरेश जी धोपटे अमोल जी गुजर,राजन सिंग, राजेश गोमकाळे, राजु भोस्कर , नितेश वंगे, प्रशांत भुरे,नंदु लेकुरवाडे व लेकसभेतील सर्व उपजिल्हा प्रमुख, संघटप्रमुख, तालुका प्रमुख, तालुका संघटक प्रमुख व पदाधिकारी उपस्थीत होते.

राष्ट्रवादी चे माजी शहर अध्यक्ष वर भ्याड हल्ल्याच्या दोषींवर

कडक कारवाई करा- पत्रकार परिषदेत ॲड . सुधिर कोठारी व माजी आ. राजू तिमांडे

यांची मागणी ; झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला

दैं.जनप्रभात
ता. प्रतिनिधी /अमोल झाडे

समुद्रपूर :शनिवारी (ता . चार) राष्ट्रवादी कांग्रेसच्या माजी शहर अध्यक्ष मनीष गांधी वर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करित जिल्हा अध्यक्ष वर सुद्धा गुन्हा दाखल करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी ॲड . सुधिर कोठारी व माजी आ. राजू तिमांडे यांनी पत्रकार परिषदेत केली शुक्रवार (ता . तीन) वर्धा येथे राष्ट्रवादी कांग्रेस चे जिल्हाध्यक्ष सुनिल राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. याबाबत राष्ट्रवादी कांग्रेसचे मनिष गांधी यांनी जिल्हाध्यक्ष राऊत यांना भ्रमणध्वनी करून आम्हाला विश्वासात न घेता नियुक्त्या कशा केल्या ? अशी विचारणा करायला गेले असता जिल्हाध्यक्ष राऊत यांनी फोन बंद केला . त्यानंतर राष्ट्रवादी कॉग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अतूल वांदिले यांनी मनिष गांधीला फोन केला असता दोघात वाद झाला . मग वाद चर्चा करून सोडविण्यासाठी समुद्रपूरला भेटायचे ठरले . सौरभ साळवे , वैभव मेंढूले, रंजीत चावरे आदी कार्यकर्त्यांसह मनिष गांधी विद्या विकास महाविद्यालया जवळील पानटपरी उभा असताना तेथे येऊन अतुल वंदिले व अधिक चार यांनी ,त्याला रॉडने मारहाण करण्यात आली . झालेल्या मारहाणीत मनिषच्या डोक्याला सहा टाके पडले. ग्रामिण रुग्णालयात प्रथम उपचार दिल्यानंतर सावंगी येथील आचार्य विनोबा भावे रुग्णालयत दाखल करण्यात आले . त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहीती देऊन या सर्व वादाची सुरुवात जिल्हा अध्यक्ष पासून झाल्याने त्याचे वर सुध्दा गुन्हा दाखल करावा यापध्दतीने मारहाण करणे निंदनीय असून,



या भ्याड हल्ल्याचा निषेध करित पोलीस प्रशासनाने दोषीवर कडक कारवाई करावी, अशी मागणी पत्रकार परिषदेत ॲड . सुधिर कोठारी व माजी आ. राजू तिमांडे यांनी केली . यावेळी कृषी उत्पन बाजार समितीचे सभापती हिंमत चतुर, कामगार सेलचे आफताफ खान , सुरेन्द्र कुकेकार , नगराध्यक्ष योगिता तुळणकर, उपनगराध्यक्ष बाबाराव थुटे ,गटनेते प्रवीण बादले ,नगरसेविका माया जीवतोडे, जया कोराम, अमित वासनिक ,लीलाधर मडावी , गजानन वाघमारे,जनार्दन हुलके ,सौरभ साळवे अधिक कार्यकर्ते उपस्थित होते .

बी आर एस कडून हळदी कुंकू कार्यक्रमाचे

आयोजन कार्यक्रमात हजारो महिलांची उपस्थिती

दैं.जनप्रभात
कारंजा/प्रतिनिधी

कारंजा:- येथे भारत राष्ट्र समिती च्या महिला नेत्या हर्षाताई बेलखडे यांच्या कडून हळदी कुंकू कार्यक्रमचे आयोजन स्थानिक मन्नालाला मतादिन सभागृहात करण्यात आले होते या कार्यक्रमला कारंजा शहरासह तालुक्यातील सात हजार महिलांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला होता या हळदीकुंकू कार्यक्रमात विशेष आकर्षण व वेशभूषा म्हणून पाहिलं ते चौथ बक्षीस २ ग्राम सोने,२० चांदीचे सिक्के, पैठणी साडी, मोबाईल असे बक्षीस ठेवण्यात आले होते कार्यक्रमला परिसरातील महिलांनी विविध वेष भूषे मध्ये या कार्यक्रमला हजेरी लावली होती जवळपास सात हजार महिलांची लक्षणीय उपस्थिती होती कार्यक्रमात नागपूर येथील नृत्य संघाने संगीतमय कार्यक्रम सादर केला आहे

****



ज्युनिअर राज्यस्तरीय चॉकबॉल स्पर्धेत वर्धा संघाला तृतीय क्रमांक.



दैं.जनप्रभात
प्रशांत झाडे/प्रतिनिधी

सेलू. :- नुकत्याच गोंदिया येथे आयोजित ११वी राज्यस्तरीय चॉकबॉल स्पर्धेत वर्धा जिल्हा संघाला तृतीय क्रमांक प्राप्त झाले. २ ते ४ फेब्रुवारी या कालावधीत मारारटोली जिल्हा क्रीडा संकुल येथे राज्यस्तरीय ज्युनिअर चॉकबॉल स्पर्धे आयोजन गोंदिया चॉकबॉल असोसिएशन तर्फे करण्यात आले होते. या स्पर्धेत वर्धा संघांनी अतिशय चुरशीच्या सामन्यात ठाणे ग्रा. संघाला हरवत राज्यस्तरीय ज्युनिअर चॉकबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावले.विजय संघामध्ये कर्णधार साहिल कुमरे,उप कर्णधार प्रणव वाढवे, बादल ढोबळे,संतोष जाधव,यश राऊत, साहिल शाहा, चेतन चौहान , रुपेश पोहणे,अखिल फुळमाली खेळाडू म्हणून खेळले तर या संघाला प्रशिक्षक म्हणून राकेश बोंद्रे व व्यवस्थापक म्हणून करण चौहान यांनी कार्य केले. खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय अनंत भाकरे,अजर शेख ,मंगल जगताप ,निसार सैय्यद व शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी ल दिले.वर्धा जिल्हा चॉकबॉल संघटेचे सचिव अनंत भाकरे यांनी विजय संघाचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

****

लाखो रूपयांचा निधी खर्च होऊनही घोराड कोलगाव रस्याची अवस्था बिकट

शेतकऱ्यांनी खासदारांस दिले निवेदन



दैं.जनप्रभात
प्रशांत झाडे/प्रतिनिधी

सेलू.:- घोराड कोलगाव या रस्त्याचे कामावर यापूर्वी लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही या रस्त्याची अवस्था बिकट झाली असून यात मोठा गैरप्रकार झाल्याची ओरड होत आहे रस्त्याची ही अवस्था पाहता या परिसरातील शेतकर्यांनी खासदार रामदास तडस यांना निवेदन सादर केले असून तात्काळ या रस्त्याचे कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे गेल्या काही वर्षांत लाखोचा निधी या रस्त्याचे कामासाठी खर्च झाल्यानंतर आज या रस्त्याची अवस्था बिकट असून या रस्त्यावरून मार्गक्रमण करणे अवघड झाले आहे या रस्त्यावर बहुतांश शेतकर्यांची शेती असल्याने त्यांचे आवागमण जास्त आहे या रस्त्याची ही अवस्था पाहता येथील शेतकऱ्यांनी या विभागाचे आमदार डॉ पंकज भोयर यांना यापुर्वी निवेदन सादर केले पण याकडे लोकप्रतिनिधी लक्ष द्यायला तयार नसल्याने आजही शेतकर्यांना या खड्ड्याचा सामना करावा लागत आहे

घोराड कोलगाव या दोन गावाला जोडणाऱ्या या रसत्यावर वारवांर निधी खर्च करून याची डागडुजी करण्यात आली एवढेच नव्हे तर घोराड पासून काही अंतर या रस्त्याचे डांबरीकरणही यापूर्वी केल्या गेले माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी या परिसराचा दौरा केला तेव्हाही या रस्त्याचे कामासाठी लाखोचा निधी खर्च करण्यात आला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत हे काम झाले आदिवासी भागासाठीचा विशेष निधी यासाठी उपलब्ध करून देण्यात आला होता एवढ्या मोठ्या प्रमाणात वारवांर लाखोचा निधी खर्च झाल्यानंतर आज या रस्त्याची दुरावस्था पाहता या रस्त्याचे कामात मोठा गैरप्रकार झाल्याचे उघडकीस येत आहे यात मागील वेळेत झालेल्या कामात या रस्त्याची डागडुजी करतांना थातूरमातूर कामे करून मलींदा लाटण्याचे काम स्थानिक अधिकारी व कंत्राटदाराकडून झाले असल्याची ओरड आहे आज या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून चिखलाचे साम्राज्य पसरले आहेत रस्त्यावर ठिकठिकाणी गिट्टीचा सडा पडलेला आहे या रस्त्यावर असलेले खड्डे पाहता या खड्ड्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही या खड्ड्यातून मार्ग काढण्यासाठी वाहनचालकाला तारेवरची कसरत करावी लागत आहे या रस्त्यावरून बैलगाडी सोडा साधी दुचाकी चालवणे कठीण झाले आहे हा रस्ता येणार्या जाणार्या चे कंबरडे मोडणारा ठरत आहे या रस्त्यावर पडलेले खड्डे पाहता हा खड्ड्याचा रस्ता अशी ओळख या रस्त्याची झाली आहे या रस्त्याबाबत अनेकदा निवेदनही सादर करण्यात आले पण शासनाकडून याकडे दुर्लक्ष होत आहे या रस्त्याची ही अवस्था पाहता शासनाने याकडे जातीने लक्ष देऊन याची सखोल चौकशी करुन दोषीवर कारवाई करावी तसेच तात्काळ या रस्त्याचे कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी खासदार रामदास तडस यांना दिलेल्या निवेदनाडे करण्यात आली आहे

सौ. यशोदा विकास मुकनर बनल्या 'वहाद' गावच्या पहिल्या "महिला पोलिस पाटील"

दैं.जनप्रभात
उपसंपादक/ विष्णू मोहन पोले

लातुर :- कंधार तालुक्यातील मौजे. वहाद येथे नुकत्याच झालेल्या नांदेड जिल्हा पोलीस पाटील भरती प्रक्रिया २०२३ अंतर्गत सौ. यशोदा विकास मुकनर यांची वहाद गावच्या पोलीस पाटील पदी निवड झाली आहे. त्या वहाद गावच्या पहिल्या महिला पोलीस पाटील बनल्या आहेत. त्यांचे चुलत सासरे माजी सरपंच कै. आप्पाराव शाहूजी पाटील मुकनर यांचा वहाद गावच्या राजकारणात महत्वाचा वाटा होता. गेली चार दशके गावच्या राजकारणाचे ते केंद्रबिंदू होते. सर्वसामान्य व्यक्तीला न्याय भेटला पाहिजे, जे सत्य आहे ते बोलले पाहिजे, कोणत्याही गोरगरीब जनतेवर अन्याय होता कामा नये व गावातील तळागाळातील शेवटच्या व्यक्तीचा



विकास झाला पाहिजे असे दूरदृष्टी चे नेतृत्व म्हणून कै. आप्पाराव पा. मुकनर यांची वहाद व परिसरात ख्याती आहे. ते नांदेड जिल्हयाचे लोकप्रिय खासदार प्रतापराव पा. चिखलीकर साहेब यांचे जुने व निष्ठावंतत्यांच्या या निवडीबददल नांदेड जिल्हयाचे लोकप्रिय खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब, मुखेड – कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड साहेब, भाजप प्रदेश प्रवक्ते श्री गणेशदादा हाके साहेब, भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य व माजी सभापती श्री. बाबुरावजी केंद्रे उमरगेकर, माजी जिल्हा परिषद सदस्या व भाजप महाराष्ट्र प्रदेश उपाध्य क्षा सौ. प्रणिताई देवरे – चिखलीकर, माजी जि. प. सभापती व लोहा कंधार विधानसभा निवडूक प्रमुख श्री. प्रविण पाटील चिखलीकर, भाजप जिल्हा सरचिटणीस व माजी भाजपा जिल्हा अध्यक्षा सौ. चित्ररेखाताई शाहूराज पा. गोरे, माजी जि.प. सदस्य बाबुराव मल्हार युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अंतेशवर तुडमे पा. गिरे, श्री. संजय निलपत्रेवार साहेब (सहायक पोलीस निरिक्षक पो. स्टे. माळाकोळी), तसेच गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष, सर्व समाजबांधव, तसेच समस्त गावकरी मंडळी वहाद यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

****

तालुका वैद्यकीय कार्यालय नरखेडला स्थलांतरित होणार !

जि.प. उपाध्यक्षा कुंदाताई राऊत यांचे आदेश

दैं.जनप्रभात
नरखेड / प्रतिनिधी



नरखेड तालुक्यातील सावरगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात सुरू असलेला वैद्यकीय कार्यालयाचा कारभार लवकरच नरखेडा स्थलांतरीत होणार आहे. जि.प. उपाध्यक्षा कुंदाताई राऊत यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अजय डवले नागपूर यांना तसेच आदेशही दिले असल्याची माहिती आहे.नरखेड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय कार्यालय जीर्ण झाल्याचे कारण समोर करून मागील ३ वर्षांपासून नरखेड येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाचा कारभार हा प्राथमिक आरोग्य केंद्र सावरगाववरून सुरू होता. त्यामुळे नरखेड ग्रामीण रुग्णालय परिसरात नवीन इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. सुसज्ज इमारतीचे बांधकाम १ वर्षांपासून पूर्ण झालेले असून ११ ऑक्टोबर २०२३ ला बांधकाम विभागाकडून नरखेड तालुका आरोग्य अधिकारी यांना इमारत हस्तातरीत करण्यात आली होती, परंतु तालुका वैद्यकीय अधिकारी हे आपले कार्यालय स्थलांतरीत करण्यास टाळाटाळ करत असल्याने मागील काही दिवसांपूर्वी काही वृत्तपत्राने सुसज्ज इमारत खात आहे धूळ ही बातमी प्रसारित केल्याने जिल्हा परिषद उपाध्यक्षा कुंदाताई राऊत यांनी याची दखल घेत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अजय डवले नागपूर यांना २ फेब्रुवारी २०२४ ला आदेश देत येत्या ८ फेब्रुवारीपर्यंत नरखेड तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय हे आपल्या मूळ ठिकाणी नरखेड ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात सुसज्ज असलेल्या इमारतीत स्थलांतरित करण्यात यावे असे स्पष्ट आदेश बजविण्यात आले आहे. त्यामुळे आता कर्मचाऱ्यांना तसेच सामान्य नागरिकांना होणारा अतिरिक्त ५५ किलोमीटरचा प्रवास टाळता येणार असून त्यामुळे पूर्वीपेक्षा कामांना गती येण्यास मदत होणार आहे.

कामठी-कन्हान मेट्रो रेल तसेच ड्रॅगन पॅलस मेट्रो स्टेशन च्या उभारणीच्या कामाला गती द्या – ॲड. सुलेखाताई कुंभारे यानी केली मागणी

महामेट्रो च्या कार्यालयात झालेल्या बैठकीत मुख्य प्रबंधक यांची सकारात्मक भूमिका

दैं.जनप्रभात
नंदू कोल्हे /प्रतिनिधी

कामठी:- मेट्रो-२ अंतर्गत येणा-या ॲटोमोटिव्ह चौक ते कामठी कन्हान मेट्रो रेल च्या कामाला तसेच ड्रैगन पैलेस मेट्रो स्टोशन च्या उभारणीला गती द्या अशी मागणी ड्रॅगन पॅलेस च्या प्रमुख तसेच माजी राज्यमंत्री ॲड. सुलेखाताई कुंभारे यांनी शुक्रवारी दि.०२ फेब्रुवारी २०२४ रोजी महामेट्रो नागपुर कार्यालयात बैठकी दरम्यान केली बैठकीला महामेट्रो चे मुख्य प्रबंधक श्रावण हर्डीकर प्रामुख्याने उपस्थित होते ॲड. सुलेखाताई कुंभारे यांच्या विनंतीवरून बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत ॲड सुलेस्वाताई कुंभारे यांनी माहीती दिली की, २०१८ साली ड्रॅगन पॅलेस येथे आंतरराष्ट्रिय बौध्द धम्म परिषद ला प्रमुख उपस्थितीत केंद्रिय मंत्री, ना.नितीनजी गडकरी यांनी जाहीर भाषणातून ड्रॅगन पॅलिस ची प्रतिकृती असलेली ड्रॅगन पॅलेस मेट्रो स्टेशन बांधण्याचे आश्वासन दिले होते परंतु मेट्रो-२ ला मंजूरी न मिळाल्यामुळे कामठी-कन्हान मेट्रो रेल वे काम रखडले होते. गेल्या वर्षी मेट्रो-२ ला परवानगी मिळाल्यामुळे ग्रामिण भागाला जोडणारा कामठी-कन्हान मेट्रो रेल च्या कामाला गती देण्यात यावी तसेच ड्रॅगन पॅलेस ला भेट देणा-या देश- विदेशातील लाखो पर्यटकांना सुविधा उपलब्ध करून

कामठी-कन्हान च्या जनतेकरीता मेट्रो रेल्वे सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सकारात्मक भूमिका घेणा-या महा मेट्रो चे मुख्य प्रबंधक यांचे ॲड. सुलेखाताई कुंभारे यांनी बैठकीअंती आभार मानले.



देण्याकरीता ड्रॅगन पॅलेस मेट्रो स्टेशन च्या कामाला सुध्दा त्वरीत सुरू करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. याप्रसंगी नव्याने रूजू झालेले महामेट्रो वे मुख्य प्रबंधक श्री.श्रावण हडर्डीकर यांना कामठी-कन्हान मेट्रो रेल तसेच ड्रॅगन पॅलेस मेट्रो स्टेशन उभारण्याकरीता या आधी केलेल्या कामाच्या पाठपुराव्याचे सादरीकरण सुध्दा दाखविण्यात आले मुख्य प्रबंधक यांनी वरील विषयावर सविस्तर चर्चा केल्यानंतर कामठी-कन्हान मेट्रो रेल च्या कामाला गतीमीन करण्याचे श्री श्रावण हर्डीकर यांनी आश्वासन दिले तसेच ड्रॅगन पॅलेस मेट्रो स्टेशन करीता जागेची निवड व आराखडा येत्या १० दिवसात तयार करण्याचे निर्देश बैठकीला उपस्थित संबंधीत अधिका-यांना देण्यात आले.

खसाला गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव सहकार्य करणार -आमदार टेकचंद सावरकर

दैं.जनप्रभात
नंदू कोल्हे / प्रतिनिधी

कामठी:- खसाळा गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देणार असल्याचे मत कामठी-मौदा विधानसभा क्षेत्राचे आमदार टेकचंद सावरकर यांनी खसाळा ग्रामपंचायत अंतर्गत हनुमान मंदिर प्रवेशडर व सभागृहाच्या भूमिपूजन प्रसंगी मार्गदर्शन करताना व्यक्त केले. प्रदेश भाजप अध्यक्ष व विधान परिषद सदस्य चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अथक प्रयत्नाने तीर्थक्षेत्र पर्यटन निधीतून एक करोड रुपये मंजूर हनुमान मंदिर प्रवेशडर व सभागृहाचे भूमिपूजन आमदार टेकचंद सावरकर यांचे हस्ते करण्यात आले यावेळी नागपूर



जिल्हा भाजप महामंत्री अनिल निधान, प्रदेश भाजप युवा मोर्चा सदस्य संकेत बावनकुळे, जिल्हा परिषद सदस्य मोहन माकडे, कामठी तालुका भाजप अध्यक्ष उमेश रडके, नारायण बावनकुळे, सरपंच जयश्री इंगोले ,उपसरपंच अतुल बावनकुळे, माजी सरपंच देवराव डाखोरे, रवींद्र पारधी ,धनंजय इंगोले, साधू गभने ,गुलाबराव बावनकुळे ,मोहन वैरागळे ,कवठ्याचे सरपंच निलेश डांफरे, उपसरपंच रवींद्र कुहीटे, ग्रामविकास अधिकारी अरुण बोंद्रे, ग्रामपंचायत सदस्य रवींद्र पारधी, अमोल वाघमारे ,कुणाल गभने ,छबीबाई रोकडे, प्रेरणा बावनकुळे, अश्विनी भलावी ,अर्चना शंभरकर, प्रतिभा गभने श मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते कार्यक्रमात प्रमुख अतिथीनि मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच जयश्री इंगोले यांनी केले संचालन मोहन वैरागडे यांनी केले व आभार प्रदर्शन उपसरपंच अतुल बावनकुळे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यावर एक शस्त्रक्रिया झाली आहे. डोळ्याचा त्रास होत असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोळ्याची तपासणी केली होती. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांच्यावर लेझर ट्रिटमेंटद्वारे शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सकाळी नऊ वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यावर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे आपल्या ठाण्याच्या घरी परतले आहेत. शस्त्रक्रियेनंतर काही काळ विश्रांतीचा सल्ला डॉक्टरांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला आहे.

मराठा सर्वेक्षणात आरोग्य सेविकेला मारहाण

मुंबई : २३ जानेवारीपासून मुंबईत मराठा सर्वेक्षणाला सुरुवात झाली असून सर्वेक्षण करणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यात वांद्रे येथे मराठा सर्वेक्षणात आरोग्य सेविकेला मारहाण झाल्याचे आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेकडून सांगण्यात आले. दरम्यान, या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले. दरम्यान, मारहाण करणाऱ्यांना त्वरित अटक करण्यात यावी, अशी मागणी आरोग्यसेवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश देवदास यांनी केली आहे. मराठा सर्वेक्षणासाठी पालिकेच्या विविध विभागांतील ३० हजार कर्मचाऱ्यांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मात्र या सर्वेक्षणात सार्वजनिक आरोग्य खात्याकडून जबरदस्ती केली जाते. सर्वेक्षणावेळी डॉक्टर्स व महिला आरोग्यसेविका वर नागरिकांकडून हल्ले होत असून, अपमान केला जात आहे. पालिका प्रशासन महिला डॉक्टर्स, महिला आरोग्य सेविकांना संरक्षण देवू शकत नसेल, तर सर्वेक्षण बंद करावे व ज्यांनी मारहाण केली, त्यांना त्वरित अटक करण्यात यावी, अशी मागणी केल्याचे ॲड. प्रकाश देवदास म्हणाले.

वृत्तपत्र विक्रेत्याला मिळाली डॉक्टरेट



मुंबई : अंधेरी येथील हॉटेल कोहिनूर कॉन्टिनेन्टलमध्ये २४ जानेवारी रोजी एम्पॉवर सोशल अँड एज्युकेशन ट्रस्ट आयोजित ११ वा भारत निर्माण योगदान अवॉर्ड २०२४ या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात लोअर परळ विभागातील वृत्तपत्र विक्रेते डॉ. नीलेश मानकर यांना सामाजिक क्षेत्रातील केलेल्या कार्याबद्दल 'सोशल वर्कर' ही पदवी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी लोअर परळ वृत्तपत्र विक्रेत्या संघाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी अमेरिकन युनिव्हर्सिटीचे संस्थापक आणि चेअरमन मधु किशन यांना आमंत्रित केले होते. त्याचप्रमाणे या कार्यक्रमासाठी भारताच्या कोनाकोपऱ्यातून विविध मान्यवर उपस्थित होते. मॅनेजिंग ट्रस्टी डॉ. घनश्याम कोळंबे यांनी सर्वांचे आभार मानले.

शॉर्ट फिल्मसाठी लेखकाची साडेपाच लाखांची फसवणूक

मुंबई : शॉर्ट फिल्मसाठी एका लेखकांची साडेपाच लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध ओशिवरा पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. मनोज खाडे, धनंजय मान, रोहित यादव आदित्य चौधरी अशी या चौघांची नावे असून, पळून गेलेल्या या चौघांच्या अटकेसाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. तक्रारदार फिल्ममेकिंगचे काम करून ते कथा लेखक म्हणूनही काम करतात. नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांची फेसबुकवरून संतोष गुप्ताशी ओळख झाली होती. तो एका निर्मात्याच्या फेसबुक ग्रुपमध्ये होता, त्यामुळे त्यांनी त्याला ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी ॲप्रुव्हल देण्यासाठी विनंती केली होती. त्याच्याच माध्यमातून त्यांची इतर चारही आरोपींशी ओळख झाली होती. त्यांना एका शॉर्ट फिल्मसाठी फायनान्सची गरज असल्याने रोहितने त्यांची ओळख फॉक्स व्हिजन फिल्मचे मालक धनंजय मान आणि मनोज खाडेशी करून दिली होती. त्यानंतर त्यांच्यात एक बैठक झाली होती. ते निर्माता-दिग्दर्शक असलेल्या एका शॉर्ट फिल्मसाठी त्यांनी त्यांना बारा लाखांचे फायनान्स आणि ॲमेझॉनवर ही फिल्म रिलीज करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामोबदल्यात त्यांना २५ टक्के कमिशन मिळण्याचा एक करार झाला होता. त्यानंतर त्यांनी एक मुलाकात नावाच्या शॉर्ट फिल्मची तयारी सुरू केली होती.

तीन लाख कारागिरांना मुख्य प्रवाहात आणणार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : विश्वकर्मा योजनेच्या १०१ कौशल्य केंद्रांचा शुभारंभ

प्रतिनिधी/मुंबई

पारंपरिक कारागीर आणि हस्तकलेला ओळख प्राप्त करून देणारी पी. एम. विश्वकर्मा सन्मान योजना नरेंद्र मोदी यांनी देशात सुरू केली आहे. महाराष्ट्र या सन्मान योजनेतही अग्रेसर राहील, असा विश्वास व्यक्त करत या योजनेंतर्गत २०२८ पर्यंत तीन लाख कारागिरांना विकासाच्या प्रवाहात आणणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे दिली.

एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे पी. एम. विश्वकर्मा कौशल्य योजनेंतर्गत राज्यातील १०१ केंद्रांचा शुभारंभ रिमोटद्वारे करण्यात आला. यावेळी बोलताना शिंदे यांनी पी. एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेतून राज्यात नवनवीन स्टार्टअपही सुरू व्हावीत आणि या स्टार्टअपनी जागतिक स्पर्धेत उतरावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. पी. एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यांतील १०१ तुकड्यांना आपण प्रशिक्षण देत आहोत. आगामी काळात अन्य जिल्ह्यांतही या प्रशिक्षणाचा विस्तार करण्यात येईल आणि त्याला सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल, असे शिंदे यांनी सांगितले.

राज्यात कौशल्य विकासासाठी मुंबईसह नागपूर, पुणे येथे कौशल्य विकास विद्यापीठ सुरू केली आहेत. राज्यात नमो रोजगार



अभियानांतर्गत नमो महारोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. नागपूरमध्ये मेळावा आयोजित केला होता. लवकरच ठाण्यामध्ये हा मेळावा होईल. महाराष्ट्र हे उद्योगाभिमुख, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि प्राधान्य देणारे राज्य आहे. त्यामुळेच राज्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक येत आहे. दावोसमध्ये ३ लाख ८३ हजार कोटींचे सामंजस्य करार केले असून यातून अनेक रोजगार निर्माण होतील, असा विश्वास शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी, महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेद मनी, केंद्रीय कौशल्य विकास विभागाचे सचिव अतुल तिवारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. कार्यक्रमाला कौशल्य विकास विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगांबर दळवी, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळाचे संचालक योगेश पाटील, राज्यातील १५ जिल्ह्यांतील स्थानिक लोकप्रतिनिधी, विश्वकर्मा केंद्राचे संचालक, स्थानिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अधिकारी, प्रशिक्षणार्थी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मी काँग्रेससोबतच!

आमदार झिशान सिद्दीकी यांचे स्पष्टीकरण

विशेष प्रतिनिधी/मुंबई

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय गणित घालण्याचे काम वेगात सुरू आहे. यानिमित्ताने विधानसभेचीही आखणी केली जात आहे. विशेषतः सत्तेच्या जोरावर विरोधकांना जाळ्यात ओढण्याचे काम वेगात सुरू आहे. त्यातल्या त्यात महायुतीचे मुंबईवर अधिक लक्ष आहे. या अगोदर माजी खासदार मिलिंद देवरा यांना शिंदे गटात घेऊन काँग्रेसला धक्का दिला. आता काँग्रेस आमदार झिशान सिद्दीकी यांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न आहे. त्यांचे वडील बाबा सिद्दीकी अजित पवार गटात जाणार असल्याचे बोलले जात होते. दरम्यान, आमदार झिशान सिद्दीकी यांनी आपण काँग्रेसमध्येच असल्याचे स्पष्टीकरण दिले. त्यामुळे तूर्त यावर पडदा पडला आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी अजित पवार गटात जाणार असल्याचे बोलले जात होते. त्यामुळे त्यांच्यासोबत काँग्रेस आमदार झिशान सिद्दीकीदेखील जाणार का, यावरून चर्चा रंगली होती. त्यामुळे मुंबईत काँग्रेसला आणखी एक धक्का बसतो की काय, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. परंतु, आता खुद्द आमदार झिशान सिद्दीकी आपण काँग्रेस सोडून कुठेही जाणार नाही, असे म्हटले. त्यामुळे तूर्त तरी या चर्चेवर पडदा पडला आहे. यावेळी सिद्दीकी यांनी, आमचे अजित पवार यांच्यासोबत कौटुंबिक संबंध आहेत. त्यांनी मला नेहमीच मदत केली आहे. यापुढेही ते मला मदत करीत राहतील. याचा अर्थ आम्ही त्यांच्या गटात जाणार असल्याची चर्चा चुकीची आहे, असेही ते म्हणाले. बाबा सिद्दीकींबाबत आमदार सिद्दीकी यांना विचारले असता मी फक्त स्वतःबद्दल सांगू शकतो. वडिलांची काय भूमिका आहे, ती त्यांना जाऊन विचारा, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, बाबा सिद्दीकी यांनी आगामी काळात काहीही होऊ शकते. असे सांगून ते अजित पवार गटाची वाट सुकर करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, काँग्रेसने याबाबत सावध पवित्रा घेतला आहे.

यंदा चांगला पाऊस पडणार

भारतीय हवामान खात्याचा अंदाज

पुणे : प्रशांत महासागरात सक्रिय असलेली एल-निनोची स्थिती फेब्रुवारी महिन्यातही सक्रिय राहण्याचा अंदाज आहे. मात्र, फेब्रुवारीनंतर एल-निनोची स्थिती हळूहळू कमजोर पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे.

भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरात एल-निनोची स्थिती कायम आहे. तेथील समुद्रातील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा जास्तच आहे. फेब्रुवारीअखेरपर्यंत ही स्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारीनंतर एल-निनो स्थिती हळूहळू कमजोर पडण्याचा अंदाज आहे. तसे झाल्यास यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे. तसेच हिंदी महासागरातील द्वि-ध्रुवताही सध्या सक्रिय आहे. पुढील एक-दोन महिन्यांत ही स्थिती तटस्थ अवस्थेत पोहचण्याची शक्यता आहे.

फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरी २२.७ मिमी पाऊस पडतो, सरासरीच्या तुलनेत ११९ टक्के पावसाचा अंदाज आहे. राज्यात प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

मागील वर्षभर किमान तापमान सरासरीपेक्षा जास्तच राहिले होते. जानेवारी महिन्यात किमान तापमान सरासरीपेक्षा एक ते तीन अंश सेल्सिअसने जास्तच राहिले आहे. फेब्रुवारी महिन्यातही किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. कमाल तापमान देशभरात जास्त राहण्याचा अंदाज आहे. मात्र, राज्यात मुंबई, किनारपट्टी वगळता कमाल तापमान सरासरी इतकेच राहण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिन्यात उत्तर भारतात थंडीची लाट येण्याची शक्यता कमीच आहे.

गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या आमिषाने फसवणूक

मुंबई : गुंतवणुकीवर चांगला परवाता देण्याच्या आमिषाने एका जोडप्याला सुमारे ७२ लाखांना गंडा घालणाऱ्या कोल्हापूरच्या तीन भामट्याविरुद्ध कसतुरबा मार्ग पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. देशभुषण बळवंत देशमाने, प्रितम देशभुषण देशमाने आणि राजेंद्र भीमराव नेर्लीकर अशी या तिघांची नावे असून ते तिघेही कोल्हापूरच्या उत्तर आजरा आणि हुपरीचे रहिवाशी असल्याचे पोलिसांनी सांगितले. मीनल धनपाल सेठ ही महिला बोरिवली येथे राहत तिचे पती एका खासगी कंपनीत कामाला आहेत. २०२१ साली ती तिच्या पतीसोबत कर्नाटकच्या हुबली येथील जैन मंदिरात गेली होती. तिथेच त्यांची ओळख जैन मुनी नमित सागरजी महाराज यांच्याशी झाली होती. त्यांनी अनेकदा त्यांना कौटुंबिक जीवनाबाबत चांगले मार्गदर्शन केले होते. त्यामुळे ते नियमित जैन मंदिरात दर्शनासाठी जात होते. दोन वर्षांपूर्वी महाराजांनी त्यांची ओळख देशभूषण व त्यांचा मुलगा प्रितम, राजेंद्रशी करुन दिली होती. ते तिघेही कोल्हापूरचे रहिवाशी असून, ते तिघेही महाराजांचे भक्त आहेत. या ओळखीत त्यांनी ते बडे गुंतवणुकदार असून, त्यांचा फॉरेक्स ट्रेडिंगचा व्यवसाय आहे.

मराठा सर्वेक्षणाला आव्हान देणार

पुणे : मराठा आरक्षणासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या सर्वेक्षणाला न्यायालयात आव्हान देणार असल्याचे आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी सांगितले.

मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार, कुणबी प्रमाणपत्रे देऊन मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण दिले जात आहे. मराठा समाजातील ज्या व्यक्तींकडे कुणबी प्रमाणपत्रे असतील त्यांच्या सग्यासोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्रे मिळण्याची अधिसूचना शासनाने काढली आहे. त्याचवेळी मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाचे सर्वेक्षण २३ जानेवारीपासून सुरू करण्यात आले. हे सर्वेक्षण शुक्रवारी पूर्ण झाले. त्याचा अहवाल लवकरच येणार आहे. परंतु, या अहवालास न्यायालयात आव्हान देण्याचा इशारा राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांनी दिला आहे.

हाके म्हणाले, राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल हा खोटा आहे. या अहवालाला चॅलेंज करणार आहोत. मुंबई हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात या अहवालास आव्हान दिले जाणार आहे. या अहवालाच्या आधारे सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणासंदर्भातील क्युरेटीव्ह पिटीशनच्या वेळी बाजू मांडण्यात येणार आहे. परंतु, त्या अहवालास आव्हान दिले गेल्यास सरकारपुढे अडचणी निर्माण होणार आहेत.

मराठा आरक्षणासाठी मुंबईतील ३९ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यासाठी मुंबई मनपाचे ३० हजार कर्मचारी शहर आणि उपनगर जिल्ह्यात घरोघरी फिरून सर्वेक्षण करत आहेत. अगदी सुट्टीच्या दिवशीही हे सर्वेक्षण करण्यात आले. खुल्या गटातील किंवा आरक्षणाचा लाभ नसलेल्या कुटुंबाला पूर्ण १६० प्रश्न विचारून त्यांची ॲपवर स्वाक्षरी घेण्याची प्रक्रिया करण्यात आली.

मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांचा इशारा

लक्ष्मण हाके यांना धमक्या

मराठा आरक्षणाच्या विरोधात भूमिका घेतल्यामुळे प्रा. लक्ष्मण हाके यांना धमकीचे फोन येत आहेत. त्यांना जीवे मारण्याचे कॉल येत आहेत. यासंदर्भात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केल्याचे त्यांनी सांगितले.

सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती द्या!

मुंबई/प्रतिनिधी : 'मॅट'च्या आदेशाची ढाल करून सेवाज्येष्ठता असूनही पोलीस निरीक्षक पदावर बढती देण्यापासून वंचित ठेवलेल्या महाराष्ट्र पोलीस दलातील अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील ५१ सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. आम्हाला आरक्षणाच्या आधारे नाही तर सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती द्या, अशी मागणी करत राज्य सरकारच्या धोरणासह 'मॅट'च्या आदेशाला आव्हान दिले आहे.

या याचिकेची न्या. अतुल चांदुरकर आणि न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने गंभीर दखल घेतली. या प्रकरणाची सुनावणी ५ फेब्रुवारीला सुनावणी निश्चित केली आहे.

सेवाज्येष्ठता असूनही पदोन्नतीपासून वंचित राहिलेल्या आणि महाराष्ट्र पोलीस दलातील अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील ५१ सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी उच्च न्यायालयात धाव घेत ज्येष्ठ वकील सुरेश माने यांच्यामार्फत रिट याचिका



५१ सहाय्यक पोलीस निरीक्षक हायकोर्टात

दाखल केली आहे.

या याचिकेवर न्या. अतुल चांदुरकर आणि न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठासमोर प्राथमिक सुनावणी झाली. यावेळी ॲड. अनिल साखरे यांनी याचिकाकर्ते ५१ सहाय्यक पोलीस निरीक्षक हे १०२ च्या बॅचचे अधिकारी आहेत.

राज्यभरातील विविध पोलीस ठाण्यांत १० वर्षांपासून एकाच पदावर कार्यरत आहेत. सरकारने सेवाज्येष्ठतेचा विचार करून पदोन्नती द्यायला हवी होती. मात्र तसे न करता 'मॅट'च्या ८ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या आदेशाचे पुढे करून पदोन्नतीपासून वंचित ठेवले आहे. हा अन्याय आहे, असा दावा त्यांनी केला. तसेच सरकारचे चुकीचे धोरण आणि 'मॅट'च्या आदेशाकडे खंडपीठाचे लक्ष वेधले. याची दखल घेत खंडपीठाने राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश देत याचिकेची ५ फेब्रुवारी रोजी तातडीने सुनावणी घेण्याचे निश्चित केले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक हे थेट निवड प्रक्रियेतून महाराष्ट्र पोलीस दलाच्या सेवेत दाखल झाले होते. १९९५ च्या पोलीस नियमावलीनुसार त्यांची निवड करण्यात आली होती. त्यांना २०१७ मधील विजय घोगरे प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ देऊन पदोन्नतीपासून वंचित ठेवता येणार नाही, असा दावा याचिकेत केला आहे.



वकील दाम्पत्याच्या हत्येचा निषेध करीत संघटनांचे आंदोलन

मुंबई : वकिलांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटना वाढत आहे, त्या थांबाव्यात व अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथील राजाराम आढाव (५२) व मनीषा आढाव (४२) या वकील दाम्पत्याचे अपहरण करून हत्या केल्याच्या घटनेच्या निषेधार्थ मुंबईतील शहर सत्र व दिवाणी न्यायालयातील वकिलांच्या संघटनेने शुक्रवारी आझाद मैदानात आंदोलन केले. वकील संरक्षण कायद्याच्या मागणीचे सरकारला वेळोवेळी निवेदन दिले आहे. याबाबत राज्य सरकारकडून ठोस उपाययोजना होत नाही. आता जर मागणी मान्य केली नाही, तर हा मोर्चा मंत्रालयावर घेऊन जाण्यास आम्ही मागे पुढे पाहणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.

अज्ञात व्यक्तीचा गुन्हे शाखेसह एटीएसकडून शोध सुरू

मुंबई शहरात सहा ठिकाणी बॉम्बस्फोटाची धमकी

मुंबई : शहरात सहा ठिकाणी बॉम्बस्फोट होणार असल्याचा असल्याचा धमकीचा मॅसेज मुंबई पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाला प्राप्त झाल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. या धमकीची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत. दरम्यान, धमकीचा मॅसेज देणाऱ्या व्यक्तीच्या अटकेसाठी गुन्हे शाखेसह एटीएसने विशेष मोहीम हाती घेतली आहे. गेल्या काही दिवसांत बॉम्बस्फोट होणार असल्याच्या निनावी कॉल आणि मॅसेजमुळे मुंबई पोलिसांवर प्रचंड ताण येत असल्याचे एका अधिकाऱ्याने बोलताना सांगितले. गुरुवारी रात्री वरळी येथील



वाहतूक पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाला एका व्हॉट्सॲप क्रमांकावरून एक मॅसेज प्राप्त झाला होता. त्यात आम्ही मुंबई शहरात सहा ठिकाणी बॉम्ब ठेवले असून, या बॉम्बचा कुठल्याही क्षणी स्फोट होईल, असे नमूद करण्यात आले होते; मात्र सहा बॉम्बस्फोट कुठे आणि कधी होणार आहेत, याबाबत काहीच माहिती देण्यात आली नाही. संबंधित व्यक्तीची स्वतःची ओळख सांगितली नाही. ज्या मोबाईल क्रमांकावरून हा मॅसेज आला आहे, तो कोड पाकिस्तानाचा असल्याचा संशय व्यक्त होत आहे. ही माहिती नंतर संबंधित पोलिसांनी मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली होती. या धमकीची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत मुंबई शहरातील बंदोबस्तात वाढ करण्याचे आदेश दिले आहेत.

मुलीच्या संरक्षणासाठी धावून आला सुरक्षारक्षक

मुंबई : आजही शहरात महिला, मुली असुरक्षित आहेत. याचे जिवंत उदाहरण म्हणजे विक्रोळी येथे घडलेली एक दुर्दैवी घटना होय. रस्त्यावरून जाणाऱ्या एका मुलीला एका पुरुषाने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला असता त्या नराधमाला एका सुरक्षारक्षकाने आपल्या कर्तव्याचा हिसका दाखवत त्या मुलीला सुरक्षित केले. या घटनेमुळे महाराष्ट्र शासन स्थापित सुरक्षारक्षक मंडळातील सुरक्षारक्षक समीर कोळवणकर यांचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर उतळे यांनी प्रशंसापत्र देऊन अभिनंदन केले.



सहाय्यक पोलीस आयुक्तांकडून कौतुक

सुरक्षारक्षक समीर कोळवणकर कामावरून घरी बसने निघाले होते. कन्नमवार नगर विक्रोळी स्टेशनवरून जाणारी बेस्ट बस कन्नमवार नगरच्या दिशेने जात असताना टागोर नगरला जाणाऱ्या रस्त्यावरील बस स्टॉप जवळ एक विकृत पुरुष रस्त्यावरून चालणाऱ्या एका २५ वर्षीय मुलीला पाहून लैंगिक चाळे करून हावभाव करत असताना ती मुलगी घाबरून पळू लागली. तो तिला पकडायला धावला त्यावेळेस सुरक्षारक्षक समीर कोळवणकर यांनी प्रसंगावधान दाखवत त्या मुलीचे संरक्षण केले. पुढील गंभीर घटना कोळवणकर यांच्यामुळे टळली. ही घटना त्यांनी सोशल मीडियावर टाकली होती. तसेच विक्रोळी पोलीस ठाण्यामध्ये आणि डीसीपी ऑफिसला जाऊन लेखी सूचना केली होती. या प्रकरणाची दखल सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर उतळे यांनी घेत सुरक्षारक्षक कोळवणकर यांचे प्रशंसापत्र देऊन अभिनंदन केले.



चंपाई सोरेन यांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ


रांची : जेएमएमचे विधिमंडळ नेते चंपाई सोरेन यांनी शुक्रवारी झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवनावर त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. सोरेन यांच्यासोबत ज्येष्ठ काँग्रेस नेते आलमगीर आलम व राजद नेते सत्यानंद भोकता यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. चंपाई सोरेन यांनी झारखंडचे १२ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. झारखंडच्या कोल्हन विभागातील ते सहावे मुख्यमंत्री आहेत. चंपाई सोरेन यांना दहा दिवसांत बहुमत सिद्ध करण्याचे आदेश राज्यपालांनी दिले आहेत. चंपाई सोरेन यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर झामुमो, काँग्रेस व राजदचे आमदार तेलंगणाला पोहचले आहेत. रांचीहून चार्टर्ड विमानाने ते हैदराबादला पोहचले. त्यांना हैदराबादच्या लिओनिया रिसॉर्टमध्ये ठेवले आहे. चंपाई सोरेन यांच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकार येत्या ५ फेब्रुवारी रोजी विश्वासमत प्रस्ताव जिंकेल, असा दावा मंत्री आलमगीर आलम यांनी केला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

इंडिया आघाडी लोकसभेपुरतीच

जयराम रमेश : विधानसभांसाठी घटक पक्ष स्वतंत्र

रामपूरहाट (प. बंगाल) : गेली दहा वर्षे देशाची सत्ता गाजवत असलेल्या भाजपला सत्तेतून खाली खेचण्यासाठी स्थापन करण्यात आलेली इंडिया आघाडी ही केवळ २०२४ च्या लोकसभा निवडणुकांपुरती केलेली आहे. राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभांच्या निवडणुकांसाठी ही आघाडी स्थापन करण्यात आलेली नाही, असे स्पष्टीकरण काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनी शुक्रवारी दिले. २७ पक्षांची ही आघाडी अस्तित्वात असून आगामी लोकसभा एकत्रितपणे लढेल, असा ठाम विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

पश्चिम बंगालच्या बीरभूम जिल्ह्यातील रामपूरहाट येथे पत्रकार परिषदेत जयराम रमेश बोलत होते. रमेश म्हणाले की, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील जनता दल युनायटेड पक्षाने इंडिया आघाडीतून बाहेर पडून एनडीए आघाडीत प्रवेश केल्यानंतर इंडिया आघाडीतील एकूण घटक पक्षांची संख्या २८ वरून २७ झाली आहे. ही आघाडी केवळ लोकसभा निवडणुकीसाठी असून विधानसभा निवडणुकांचा या आघाडीशी काहीही संबंध नाही. मग ते महाराष्ट्र असो वा पश्चिम बंगाल. इंडिया आघाडी भाजप आणि आरएसएस यांच्या विचारसरणीचा पराभव करण्यासाठीच स्थापन करण्यात आली आहे. देशाचे संविधान आणि लोकशाही आता धोक्यात आली असून ती वाचवण्यासाठी भाजपला हरवणे आवश्यक असल्याचा इशाराही रमेश यांनी यावेळी दिला.



महाराष्ट्रात महाआघाडी राहणार

''महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना (उबाठा) पक्ष एकत्रित लढणार आहेत. मात्र, अन्य राज्यांमध्ये इंडिया आघाडीतील घटक पक्षांत कोणतीही युती होणार नाही. देशात काँग्रेस हा एकमेव पक्ष आहे, ज्याने केव्हाही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या भाजपसोबत युती केली नाही,'' असे जयराम रमेश यांनी स्पष्ट केले.


राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो न्याय यात्रेबाबत बोलताना रमेश म्हणाले की, ही यात्रा निवडणूक प्रचारमोहीम नसली व राजकीय कार्यक्रम असला तरी २०२४ सालच्या लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात ही यात्रा खूपच लाभदायी ठरणार आहे. या यात्रेमुळे काँग्रेस पक्षात नवचैतन्य संचारले असून ऊर्जा आली आहे. राहुल गांधी यांनी देखील ही यात्रा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून नसून राजकीय असल्याचे वेळोवेळी स्पष्ट केले आहे. भाजप व काँग्रेसचे विचारसरणीचे युद्ध आहे. राहुल गांधी यांच्या यात्रेचा प्रारंभ मणिपूरपासून झाला होता, तर शेवट २० मार्च रोजी महाराष्ट्रात करण्यात येणार आहे.

छगन भुजबळ भाजपच्या वाटेवर

दमानियांचा दावा : भुजबळांनी केले खंडन

प्रतिनिधी/मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ भाजपच्या वाटेवर असल्याचा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. दमानिया यांनी यासंदर्भात शुक्रवारी



एक्स या समाजमाध्यमावर पोस्ट केली. या पोस्टची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. छगन भुजबळ यांनी मात्र दमानिया यांचा हा दावा खोडून काढला आहे. नवीन काही आता मला पाहिजे असे काही नाही. असा काही प्रस्ताव मला आला नाही, अशी प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी दिली आहे.

भुजबळ भाजपच्या वाटेवर? एकेकाळी भुजबळांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध जनहित याचिका करणारा भाजप त्यांना मोठा ओबीसी नेता बनवणार? अशा भ्रष्ट माणसांना मोठं करणार, राजकारणासाठी? कुठे फेडाल हे पाप, असे दमानिया यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षणाच्या संदर्भात अधिसूचना काढली आहे. या अधिसूचनेनुसार ज्यांच्या कुणबी नोंदी सापडतील त्यांना कुणबी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाला मंत्रिपदावर असूनही छगन भुजबळ यांनी उघड विरोध केला आहे. याशिवाय भुजबळ यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यास विरोध केल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी त्यांच्या विरोधात असंसदीय भाषा वापरली. त्यामुळे भुजबळ ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर मंत्रिमंडळातून बाहेर पडतील, अशी चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर दमानिया यांची पोस्ट चर्चेत आली आहे.

दरम्यान, मला कुठल्या पदाची हौस नाही. गेल्या अनेक वर्षांपासून मी ओबीसींसाठी काम करत आहे. नवीन काही आता मला पाहिजे असे काही नाही.

निवडक राष्ट्रीय

बीटेकच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

जयपूर : कोटा येथे उत्तर प्रदेशातील बीटेकच्या विद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे. गेल्या १२ दिवसांतील ही तिसरी घटना आहे. मृत विद्यार्थ्याचे नाव नूर मोहम्मद असून तो विग्यान नगर पोलीस ठाण्यात पेइंग गेस्ट म्हणून राहत होता. पोलिसांनी सांगितले की, नूर याने गळफास लावून आत्महत्या केली. त्याच्या मृत्यूचे कारण समजू शकले नाही. विग्यान नगर पोलीस ठाण्याचे प्रमुख कौशल्य म्हणाले की, नूर मोहम्मद हा मूळचा उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यातील वीरपूरचा होता. त्याच्या आत्महत्येची बातमी कळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ३१ जानेवारी रोजी त्याने मेसमधून जेवणाचा डब्बा मागवला होता. मात्र, दुसऱ्या दिवशीपर्यंत त्याने डब्याला हात लावला नव्हता.

३४४० जहाजे, २५ हजार नाविकांना नौदलाचे संरक्षण

नवी दिल्ली : २००८ पासून आतापर्यंत ३४४० जहाजे व २५ हजार नाविकांना नौदलाने संरक्षण दिले आहे, अशी माहिती केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री अजय भट्ट यांनी लोकसभेत दिली. ते म्हणाले की, व्यापारी जहाजांचे संरक्षण करायला दिबुती, एडनचे आखात, सोमालियाचा समुद्रकिनारा व उत्तर व दक्षिण अरबी समुद्रात भारतीय नौदलाची काही पथके तैनात केली आहेत. इराणचा पाठिंबा असलेले हुथी बंडखोर हे नोव्हेंबरपासून अनेक व्यापारी जहाजांवर हल्ले करत आहेत. या हल्ल्याची माहिती तातडीने मित्र देशांना दिली जात आहे. अरबी समुद्रात अनेक व्यापारी जहाजांना मदत केली जात आहे. त्यांना अटकेपासून संरक्षण दिले जात आहे. भारतीय नौदल हे विभागीय व अन्य विभागातील नौदलांसोबत सक्रियपणे काम करत आहे.

मोदींचा उत्तराधिकारी त्यांच्यापेक्षाही कट्टर असेल!

प्रशांत किशोर : योगी आदित्यनाथ की हिमंता बिस्वा सरमा?



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेली दहा वर्षे भाजपला एकहाती सत्ता मिळवून दिली. देश-विदेशात देशाची आणि पर्यायाने भाजपची प्रतिमा उजळ केली. कलम ३७० सारखा अडचणीचा प्रश्न सोडवला. आता देखील ते २०२४ च्या निवडणुकीसाठी कंबर कसून उभे आहेत. पण, त्यांचेही वय आता होत आले आहे. यामुळे त्यांचा उत्तराधिकारी कोण, असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात नेहमीच उपस्थित होत आहे. या प्रश्नाचे उत्तर निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी दिले आहे. ते म्हणतात की, मोदींचा उत्तराधिकारी त्यांच्यापेक्षाही कट्टर असेल.

प्रशांत किशोर यांनी भाजपसंदर्भात मोठे भाष्य केले आहे. ''आज भाजप सर्व निवडणुका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बळावर जिंकत आहे. ही भाजपची मोठी ताकद आहे, पण हीच भाजपची सर्वात मोठी समस्याही आहे. कारण ते पंतप्रधान नरेंद्र मोदींवर अधिक अवलंबून आहेत,'' असे प्रशांत किशोर यांनी म्हटले आहे. याचवेळी, पंतप्रधान नरेंद्र मोदींनंतर भाजपचे नेतृत्व कोण करणार? असा प्रश्न विचारला असता? किशोर म्हणाले, ''त्यांच्यानंतर हायकमांड कोण असेल हे माहीत नाही, पण जो कोणी असेल तो त्यांच्यापेक्षाही कट्टर असेल. भाजपमध्ये देशपातळीवर सध्या दोन व्यक्तींची नावे घेण्यासारखी आहेत. एक म्हणजे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व दुसरे म्हणजे आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा.

योगी आदित्यनाथ आणि सरमा हे दोन्ही फायरब्रॅन्ड व निर्भीड नेते आहेत. कठोर व झटपट निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यात त्यांचा हातखंडा आहे. मात्र, पंतप्रधानपदाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास शिक्षण व अन्य बाबतीत सरमा योगींपेक्षा उजवे ठरतात. यामुळे मोदींचे उत्तराधिकारी हिमंता बिस्वा सरमा तर नाहीत ना, अशी शंका मनात येते.

खलिस्तानी दहशतवाद्यावर हल्ला

ओटावा : कॅनडातून सातत्याने खलिस्तान समर्थकांवरील हल्ल्यांच्या बातम्या समोर येत आहेत. शुक्रवारी ओटावा येथील एका खलिस्तान समर्थकाच्या घरावर मध्यरात्री गोळीबार झाला. आम्ही सध्या हल्लेखोरांचा शोध घेत आहोत, असे पोलिसांनी सांगितले. तसेच ज्या घरावर हल्ला झाला, त्यांच्या शेजाऱ्यांनी सागितले की, हे घर खलिस्तानी दहशतवादी हरदीप सिंह निज्जरच्या एका मित्राचे आहे.

ब्रिटिश कोलंबिया गुरुद्वारा परिषदेच्या एका प्रवक्त्याने सांगितले की, ज्या घरावर हल्ला झाला ते घर सिमरनजीत सिंह यांचे आहे. सिमरनजीत हा हरदीप सिंह निज्जरचा खास मित्र होता. जून २०२३ मध्ये हरदीप सिंह निज्जरची हत्या करण्यात आली होती. या हत्येनंतर भारत आणि कॅनडामध्ये राजकीय तणाव निर्माण झाला आहे.

देशात नीतिशून्य पक्षाची सत्ता!

शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे भाजपवर टीकास्त्र

अलिबाग : नीतिशून्य, विचारशून्य पक्ष गेली दहा वर्षे आपल्या देशावर राज्य करतो आहे. याची मला लाज वाटते आहे. त्यामुळे यापुढे असे होता कामा नये, असे आवाहन शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना केले. ते अलिबाग तालुक्यातील चौल येथे जनसंवाद मेळाव्यात बोलत होते.



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी रायगड जिल्ह्याच्या दोन दिवसीय जनसंवाद दौऱ्याला गुरुवारपासून सुरुवात केली. पहिल्या दिवशी त्यांनी पेण, अलिबाग आणि रोहा तालुक्यात जनसंवाद मेळावे घेतले. भगव्याला लागलेला कलंक पुसण्यासाठी कामाला लागण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले. यावेळी शिवसेना नेते मिलिंद नार्वेकर, माजी खासदार अनंत गीते, जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे उपस्थित होते.

ते म्हणाले की, 'तोडा फोडा आणि झोडा' ही भाजपची नीती आहे. जातीपातीत भांडणे लावायची, समाजात तेढ निर्माण करायची, हिंदू, मुस्लीम दंगे निर्माण करायचे आणि आपल्या राजकीय पोळ्या शेकायच्या, हा कार्यक्रम सुरू आहे. त्यामुळे लोकांना सतर्क करणे गरजेचे आहे. भाजप ही भेकड आणि बेडूक जनता पार्टी आहे. या पक्षातून त्या पक्षात जाणारे, कर्तृत्व नसलेले सर्वजण या पक्षात सहभागी झाले आहेत. भाजपमध्ये ना नेते जन्माला आले ना आदर्श. त्यामुळे इतर पक्षांतील नेते आणि आदर्श चोरायचे काम भाजपकडून सुरू असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला.

अडीच वर्ष मुख्यमंत्रीपदाची अट भाजपने त्यावेळी मान्य केली असती तर आज जो चोरबाजार मांडला आहे तो मांडायची वेळ आली नसती. युती सरकारच्या काळात देवेंद्र फडणवीस पाच वर्षे मुख्यमंत्री होते. निवडणुकीनंतर त्यांच्यावर अडीच वर्ष विरोधी पक्षनेते होण्याची वेळ आली. घरफोडीनंतर ते मुख्यमंत्री होतील, अशी अपेक्षा होती. पण त्यांना अर्धे उपमुख्यमंत्रीपद दिले गेले. आता ते पाव उपमुख्यमंत्री झाले असल्याचा टोला ठाकरे यांनी लगावला.

साने गुरुजींचे भव्य स्मारक उभारू

अजित पवार यांची ग्वाही : ९७ व्या मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन



प्रतिनिधी/अमळनेर

महाराष्ट्रात अध्यात्म, ज्ञान, तत्त्वज्ञान रुजविणारे अमळनेर हे महत्त्वाचे शहर आहे. प्रताप हायस्कूलमध्ये साने गुरुजींचे सहा वर्ष वास्तव्य होते. साने गुरुजींच्या स्मारकाचा प्रस्ताव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी तयार करावा. या प्रस्तावानुसार साने गुरुजींच्या स्मारकास येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. साने गुरुजींचे नावाप्रमाणेच भव्य स्मारक झाले पाहिजे, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अमळनेर मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे येथील प्रताप महाविद्यालयाच्या मैदानावर शुक्रवारी उद्घाटन झाले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक प्रा. डॉ. रवींद्र शोभणे सपत्नीक उपस्थित होते. उद्घाटक म्हणून माजी लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांची उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री गुलाबराव पाटील, निमंत्रक तथा मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, आमदार मंगेश चव्हाण, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, कार्यवाह उज्ज्वला मेहेंदळे, समन्वयक नरेंद्र पाठक, साने गुरुजींच्या पुतणी सुधा साने यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, अमळनेरमध्ये सुरू झालेल्या अनेक गोष्टी जगात पोहचल्या आहेत. विप्रो कंपनी, तत्त्वज्ञान केंद्राचा जागतिक पातळीवर नावलौकिक आहे. बहिणाबाईंनी अतिशय सोप्या भाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. राज्यात वाचनसंस्कृती वाढावी, यासाठी आम्ही शासन पातळीवर प्रयत्नशील आहोत. डिजिटल युगात वाचन संस्कृती बदलली आहे. वाचनसंस्कृती टिकून राहणे, ही समाजाची गरज आहे. मराठी साहित्य संमेलनास आता डिजिटल टच देण्यात आला आहे. सामाजिक सुधारणांच्या चळवळीत साहित्य, लेखक व कलाकारांचे अमूल्य योगदान आहे. राज्याच्या विकासासाठी साहित्यिकांनी व्यक्त झाले पाहिजे. त्यांच्या सूचनांचा निश्चितच स्वीकार केला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर म्हणाले, ''मराठी भाषा वेगवेगळ्या राज्यात पोहचविण्याचे काम बृहन्महाराष्ट्र मंडळाने केले आहे. तालुका स्तरावर साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी २ लाख रुपये निधी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या वर्षापासून शाळेत वाचनाचा तास सक्तीचा केला आहे. साहित्य पारितोषिकात शासनाचा हस्तक्षेप नसावा, ही शासनाची भूमिका आहे. साहित्याची चळवळ रुजविण्याचे काम शासनाची चार मंडळं करत आहेत. मराठी धोरण यावर्षी जाहीर करणार आहोत. लवकरच मराठी भाषा धोरण जाहीर करणार आहोत.

संत साहित्य संमेलनास दरवर्षी २५ लाख देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सहा विभागांत पुस्तकाचे गाव केले जाणार आहे. मुंबईमध्ये शासनाच्या वतीने मराठी भाषा भवन उभारण्यात येणार आहे. वाई गावात मराठी विश्वकोष मंडळाची भव्य इमारत बांधण्यात येणार आहे. मराठी युवक मंडळांना पाच हजारांचे अनुदान दिले जाईल. मराठी भाषेच्या विकासासाठी साहित्यिकांच्या अपेक्षा पूर्ण केल्या जातील, अशी ग्वाही केसरकर यांनी यावेळी दिली.



बहिणाबाईंनी खान्देशचे साहित्य समृद्ध केले -महाजन

संमेलनाच्या उद्घाटक सुमित्रा महाजन म्हणाल्या, ''काळ्या मातीला हिरवा शालू नेसवून आपल्या कवितेच्या माध्यमातून सेवा केलेले कवी ना. धों. महानोर, जीवनाचे मर्म आपल्या अहिराणी रचनेच्या माध्यमातून मांडणाऱ्या बहिणाबाई चौधरी यासारख्यांनी खान्देशचे साहित्य समृद्ध केले आहे. राजकारणातील लोकांना साहित्याचा गंध नसतो, असे म्हणता येणार नाही. साहित्यातून समाजात वागावे कसे, याची शिकवणूक मिळते. तळागाळातील लोकांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी राजकारण, समाजकारण केले जाते. पुस्तके जगाला जवळ आणण्याचे काम करतात, असे त्यांनी सांगितले.

अज्ञात व्यक्तीचा गुन्हे शाखेसह एटीएसकडून शोध सुरू

मुंबई शहरात सहा ठिकाणी बॉम्बस्फोटाची धमकी

मुंबई : शहरात सहा ठिकाणी बॉम्बस्फोट होणार असल्याचा असल्याचा धमकीचा मॅसेज मुंबई पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाला प्राप्त झाल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. या धमकीची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत. दरम्यान, धमकीचा मॅसेज देणाऱ्या व्यक्तीच्या अटकेसाठी गुन्हे शाखेसह एटीएसने विशेष मोहीम हाती घेतली आहे. गेल्या काही दिवसांत बॉम्बस्फोट होणार असल्याच्या निनावी कॉल आणि मॅसेजमुळे मुंबई पोलिसांवर प्रचंड ताण येत असल्याचे एका अधिकाऱ्याने बोलताना सांगितले. गुरुवारी रात्री वरळी येथील



वाहतूक पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाला एका व्हॉट्सॲप क्रमांकावरून एक मॅसेज प्राप्त झाला होता. त्यात आम्ही मुंबई शहरात सहा ठिकाणी बॉम्ब ठेवले असून, या बॉम्बचा कुठल्याही क्षणी स्फोट होईल, असे नमूद करण्यात आले होते; मात्र सहा बॉम्बस्फोट कुठे आणि कधी होणार आहेत, याबाबत काहीच माहिती देण्यात आली नाही. संबंधित व्यक्तीची स्वतःची ओळख सांगितली नाही. ज्या मोबाईल क्रमांकावरून हा मॅसेज आला आहे, तो कोड पाकिस्तानाचा असल्याचा संशय व्यक्त होत आहे. ही माहिती नंतर संबंधित पोलिसांनी मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली होती. या धमकीची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत मुंबई शहरातील बंदोबस्तात वाढ करण्याचे आदेश दिले आहेत.

मुलीच्या संरक्षणासाठी धावून आला सुरक्षारक्षक

मुंबई : आजही शहरात महिला, मुली असुरक्षित आहेत. याचे जिवंत उदाहरण म्हणजे विक्रोळी येथे घडलेली एक दुर्देवी घटना होय. रस्त्यावरून जाणाऱ्या एका मुलीला एका पुरुषाने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला असता त्या नराधमाला एका सुरक्षारक्षकाने आपल्या कर्तव्याचा हिसका दाखवत त्या मुलीला सुरक्षित केले. या घटनेमुळे महाराष्ट्र शासन स्थापित सुरक्षारक्षक मंडळातील सुरक्षारक्षक समीर कोळवणकर यांचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर उतळे यांनी प्रशंसापत्र देऊन अभिनंदन केले.



सहाय्यक पोलीस आयुक्तांकडून कौतुक

सुरक्षारक्षक समीर कोळवणकर कामावरून घरी बसने निघाले होते. कन्नमवार नगर विक्रोळी स्टेशनवरून जाणारी बेस्ट बस कन्नमवार नगरच्या दिशेने जात असताना टागोर नगरला जाणाऱ्या रस्त्यावरील बस स्टॉप जवळ एक विकृत पुरुष रस्त्यावरून चालणाऱ्या एका २५ वर्षीय मुलीला पाहून लैंगिक चाळे करून हावभाव करत असताना ती मुलगी घाबरून पळू लागली. तो तिला पकडायला धावला त्यावेळेस सुरक्षारक्षक समीर कोळवणकर यांनी प्रसंगावधान दाखवत त्या मुलीचे संरक्षण केले. पुढील गंभीर घटना कोळवणकर यांच्यामुळे टळली. ही घटना त्यांनी सोशल मीडियावर टाकली होती. तसेच विक्रोळी पोलीस ठाण्यामध्ये आणि डीसीपी ऑफिसला जाऊन लेखी सूचना केली होती. या प्रकरणाची दखल सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर उतळे यांनी घेत सुरक्षारक्षक कोळवणकर यांचे प्रशंसापत्र देऊन अभिनंदन केले.



व्रताचे फळ कशावर अवलंबून असते?

एखादे व्रत केल्यावर त्याचे फळ अजून कसे मिळत नाही?, म्हणून कोणी मनात विकल्प आणू नये. कोणाला लवकर, तर कोणाला उशिरा; पण फळ निश्चित मिळते. व्रताचे फळ प्रामुख्याने पुढील मुद्यांवर अवलंबून असते.

भक्तिभाव : व्रतामध्ये भक्ती सगळ्यात महत्त्वाची आहे. भक्तीशिवाय केलेला व्रताचार एक यांत्रिक कर्म ठरते.

संकल्प : राजाभाऊ परांजपे, ठाणे हे श्री गुरूमहाराजांचे शिष्य-अनुग्रहित आणि श्री बाबामहाराजांचे भक्त. त्यांना श्री गुरुचरित्र पारायणापासून काही लाभ होत नव्हता. त्यांनी ही शंका श्री बाबामहाराजांना विचारली. ते म्हणाले, "आपण पुण्याला गेलो म्हणजे श्री गुळवणी महाराजांकडेच हा विषय बोलू." पुढे परांजपे आपल्या गाडीतून श्री बाबांना घेऊन चिंचवड करून पुण्यास आले. श्री गुरूमहाराजांसमोर ते राजाभाऊ परांजपे यांना म्हणाले, "विचारा तुमचा प्रश्न." परांजपे यांनी प्रश्न विचारला.

श्री गुरूमहाराज म्हणाले, "संकल्प सोडून पारायणाला सुरुवात करता की तसेच सुरू करता?" परांजपे म्हणाले, "संकल्प वगैरे काही येत नाही, माहीत नाही. तसेच पारायण सुरू करतो." मग श्री गुरूमहाराजांनी परांजपे यांना संकल्प शिकविला, पंचांग शिकविले. नंतरच्या पारायणापासून त्यांना उत्तम अनुभव येऊ लागले.

कालमाहात्म्य : गणपतीच्या शुद्ध व वद्य चतुर्थी, म्हणजे विनायकी व संकष्टी चतुर्थी, या मंगळवारी आल्यास त्यांना 'अंगारकी' म्हणतात. एका अंगारकीने जे फळ मिळते, तसे वर्षभरच्या विनायकी किंवा संकष्टीने मिळते.

निर्जला एकादशीचे फळ चोवीस एकादशींच्या फळाइतके आहे. बहुतेक व्रते शुद्ध प्रतिपदा ते सप्तमी किंवा अष्टमीपर्यंत असतात; कारण तेव्हापासून चंद्र जास्त वाढत जाताना दिसतो, तसेच व्रताचा उद्देश सफल होण्याची संधीही उत्तरोत्तर वाढत जाते.

उन्नतांचा संकल्प व हास्यास्पद आधुनिक व्रते

प्रत्येक व्रतामागे एखाद्या उन्नतांचा संकल्प असतो, बहुधा अध्यात्मातले काही तत्त्व असते; म्हणून त्याचे फळ मिळते. कोणीतरी आधुनिक व्रते म्हणून 'शाळा बांधा, रोग्यांची शुश्रूषा करा', असे म्हणेल तर त्याचे फळ मिळणार नाही.

अडचणींमुळे व्रत पूर्ण करणे अशक्य असेल, तर काय करावे?

काही अडचणींमुळे व्रत करता येणे अशक्य असेल, तर पती, पत्नी, पुत्र, भाऊ, बहीण, शिष्य यांच्याकडून ते करवावे. हे शक्य नसेल, तर पुरोहित किंवा मित्र यांच्याकडून व तेही शक्य नसेल, तर ब्राह्मणाकडून ते पूर्ण करून घ्यावे.

अशौच, रजस्वलादोष किंवा ज्वरादी रोग आले असता, शारीरिक नियम स्वतः करावे आणि पूजा वगैरे विधी दुसऱ्यांकडून करून घ्यावे.

काम्य कर्म प्रतिनिधीच्या द्वारे करू नये. नित्य व नैमित्तिक कर्मे मात्र केली तरी चालतात.

एकापेक्षा अधिक व्रते एका काळी आली असता, ज्या गोष्टी विरुद्ध असतील, त्या क्रमाने कराव्या. तसेच नक्तभोजन व उपोषण अशी विरुद्ध असतील, तेव्हा एक आपण करावे आणि दुसरे प्रतिनिधीच्या द्वारे करावे.

सूर्यमंत्र-गायत्री

ॐ भूर्भवः स्वःतत्सवितुवरेण्यं
भगरे देवस्य धीमहि।
धियो योनः प्रचोदयात।। ॐ।।

हिंदू धर्मातील आणि सकल वेदांतील सर्वश्रेष्ठ महामंत्र म्हणून ज्याचे वर्णन केले जाते, तो वरील गायत्री मंत्र हा सूर्यमंत्र आहे.

गायत्री या महामंत्राचा शाब्दिक अर्थ थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल :

ओम - परब्रह्म; भूः- पृथ्वी, भूलोक, सृष्टी; भुवः- परलोक, अंतरिक्ष; स्वः (सुवः)-चैतन्य, आनंद, स्वर्ग; तत् - ते, त्या; सवितुः- सूर्याचे (उगवत्या तेजस्वी सूर्याचे); देवस्य- देवाचे, परमात्म्याचे; वरेण्यं-श्रेष्ठ, आदरणीय, स्वीकारण्यास योग्य; भर्ग- तेज, अज्ञानाचा आणि अंधःकाराचा नाश करणारे तेजोमंडल; देवस्य- देव, परमेश्वर; धीमहि- ध्यान करतो, चित्त एकाग्र करतो; धियः- सद्बुद्धीला; यः- जो; नः- आमच्या सर्वांच्या;

प्रचोदयात - स्फूर्ती देऊन प्रगत करतो, प्रेरणा देतो.

अर्थ : अखिल विश्वाला प्रेरणा देणाऱ्या भगवान सवित्याच्या (सूर्यनारायणाच्या) सर्वश्रेष्ठ अवर्णनीय तेजाचे आम्ही ध्यान करतो. तो सूर्यदेव आमच्या बुद्धीला उत्तम प्रेरणा आणि स्फूर्ती देवो!



हिंदू धर्मातील आणि सकल वेदांतील सर्वश्रेष्ठ महामंत्र असे वर्णन असलेल्या 'गायत्री मंत्र'च्या उत्पत्तीविषयी...

गायत्री या शब्दातील 'गय' म्हणजे प्राण आणि ज्या प्राणांचे जी रक्षण करते ती 'गायत्री'. गायत्री मंत्र म्हणून विश्वविख्यात असलेली छंदमय रचना महान तपस्वी विश्वामित्र ऋषींना स्फुरली. सुरुवातीला विश्वामित्र हे तपस्वी नसून एक राजा होते. त्यांचे मूळ नाव विश्वत्थ. एकदा ते कोशल देशात मृगयेसाठी गेले असताना त्यांना वशिष्ठ ऋषींच्या आश्रमात आतिथ्य स्वीकारण्याचा प्रसंग आला. वशिष्ठ ऋषींकडे असलेले दिव्य तेज, बुद्धिसामर्थ्य, प्रसन्नता, शांतता व आश्रमातील विपुल गोधन आणि आश्रमातील शिस्त, पवित्रता पाहून राजा विश्वत्थ प्रभावित झाले. ध्यान आणि तपश्चर्या करून हे सर्व आपण मिळवायचेच, असा मनाशी निश्चय करून त्यांनी राज्याचा त्याग केला. ऋषी बनले. एकदा ते सकाळी सूर्योदयापूर्वी ध्यानाला बसले. त्या प्रसन्न पहाटेच्या वेळी त्यांचे ध्यान-चिंतनात मग्न झाले होते. सूर्य उगवत होता. अचानकपणे त्यांचे डोळे उघडले गेले. सूर्यदर्शन झाले आणि त्या दिव्य क्षणी त्यांच्या मुखातून आकस्मिकपणे एक छंदोबद्ध सुक्त अवतरले -

तत्सवितुवरेण्यं भगरे देवस्य धीमहि। धियो योनःप्रचोदयात।।

पुढे या सुक्ताच्या सुरुवातीला 'ओम भू भुवः स्वः' जोडले गेले, हाच तो महान गायत्री मंत्र.

वोडाफोन-आयडियाच्या या प्लॅन्ससह स्विगी वन मेंबरशिप मोफत, जाणून घ्या फायदे

वी-आयच्या निवडक पोस्टपेड प्लॅन्समध्ये स्विगी वन मेंबरशिप मोफत मिळेल. स्विगी वन एक मेंबरशिप सर्व्हिस आहे जी ग्राहकांना स्विगीवर फूड ऑर्डर केल्यावर सूट आणि इतर बेनिफिट्स मिळवून देते.

वोडाफोन-आयडियानं आपल्या पोस्टपेड ग्राहकांसाठी मोफत स्विगी वन मेंबरशिपची घोषणा केली आहे. ही मेंबरशिप ऑफर निवडक पोस्टपेड प्लॅन्ससह लागू करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की वी-आयचे पोस्टपेड ग्राहकांनी या प्लॅन्सपैकी एकाची निवड केली तर त्यांना स्विगी वन मेंबरशिप मोफत मिळेल. जिचा वापर स्विगीवरून फूड ऑर्डर करताना डिस्काऊंट मिळवण्यासाठी आणि इतर बेनिफिट्ससाठी करता येईल. जर तुम्ही ५०१ रुपये किंवा त्यापेक्षा अधिकचे वी-आय मॅक्स पोस्टपेड प्लॅन वापरत असाल तर आता तुम्हाला स्विगी वन ची फ्री मेंबरशिप मिळेल. या मेंबरशिपची किंमत २,५०० रुपये आहे, परंतु वी-आय मॅक्स प्लॅनसह ही तुम्हाला मोफत मिळत आहे. वी-आयची ऑफर कंपनीच्या 'चॉइस' कॅंपेनचा भाग आहे. या कॅंपेन अंतर्गत वी-आयचे युजर्स इंटरटेन्मेंट, फूड, ट्रॅव्हल आणि मोबाईल सुरक्षासारख्या सेगमेंटमधून आवडीची सुविधा निवडू शकतात.

कोणत्या प्लॅन्सवर मिळेल ऑफर?

आता वी-आय आपल्या वी-आय मॅक्स पर्सनल आणि फॅमिली पोस्टपेड युजर्सना एकही रुपया अतिरिक्त खर्च न करता २५०० रुपयांपेक्षा जास्त किमतीची 'स्विगी वन मेंबरशिप' देत आहे. वी-आय मॅक्स पोस्टपेड युजर्स ५०१ रुपये, ७०१ रुपये, रेडएक्स प्लॅन ११०१ रुपये आणि वी-आय मॅक्स फॅमिली प्लॅन १००१ रुपये आणि ११५१ रुपयांचा प्लॅनवर स्विगी वन मेंबरशिप मिळवू शकतात. हा इतर अनेक बेनिफिट्सपैकी एक आहे.

वी-आय मॅक्स पोस्टपेडच्या पर्सनल आणि फॅमिली प्लॅनसोबत आवडीचे बेनिफिट्स हवे असतील तर पुढे या सेगमेंटची माहिती देण्यात आली आहे.

ओटीटी : ॲमेझॉन प्राइम, डिज्नी+ हॉटस्टार, सोनी लिव आणि सननेक्स्टचे सबस्क्रिप्शन

ट्रॅव्हल : ईजमायट्रिपवरून स्वस्त विमान तिकीट बुक करता येईल.

सिक्युरिटी : नॉर्टन ३६० मोबाईल सिक्युरिटीद्वारे तुमचा फोन सुरक्षित ठेवा.

फूड : इजीडाइनर आणि आता स्विगी वन मेंबरशिपद्वारे जेवणावर सूट मिळवा. वी मॅक्स पोस्टपेड प्लॅन्समध्ये ग्राहक स्वतःची लिमिट निश्चित करू शकतात तसेच प्रायॉरिटी कस्टमर सर्व्हिसचा देखील लाभ घेऊ शकतात.

आता सिम कार्ड आणि इंटरनेटविना देखील पाहता येतील ऑनलाईन व्हिडीओ, जाणून घ्या सरकारचा प्लॅन



सरकार लवकरच सिमकार्ड आणि इंटरनेटविना इंटरनेट सर्व्हिस मोबाइलवर उपलब्ध करण्याची योजना बनवत आहे. ही एक डॉयरेक्ट टू मोबाइल सर्व्हिस आहे जी १९ शहरांमध्ये लागू केली जाईल. यासाठी ४७०-५८२ मेगाहर्ट्स स्पेक्ट्रम रिजर्व करण्यात आला आहे. याच्या माध्यमातून ८० कोटी युजर्सना फायदा मिळेल आणि व्हिडीओवरील २५ ते ३० टक्के ट्रॅफिक डी२एम वर गेल्यामुळे ५जी नेटवर्कवरील भार कमी होईल.

साधारणतः ऑनलाईन व्हिडीओ पाहताना तुम्हाला इंटरनेट आणि सिम कार्डची आवश्यकत असते. अनेकदा नेटवर्क नसल्यामुळे इंटरनेट सेवा बाधित होते. आता असं होणार नाही, सरकार लवकरच सिम कार्ड आणि इंटरनेटविना इंटरनेट सर्व्हिस मोबाइलवर उपलब्ध करेल. म्हणजे नेटवर्क आणि सिमविना ऑनलाईन स्ट्रीमिंग होणारे व्हिडीओ पाहता येतील. ही एक डॉयरेक्ट टू मोबाइल ब्रॉडकास्टिंग सर्व्हिस आहे.

१९ शहरांमध्ये सर्व्हिस होईल उपलब्ध

इन्फॉर्मेशन अँड ब्रॉडकॉस्टिंग सेक्रटरी अपूर्वा चंद्रानं ब्रॉडकॉस्टिंग समिटला संबोधित करताना सांगितलं की स्वदेशी डॉयरेक्ट टू मोबाइल (डी२एम) सर्व्हिसचं ट्रायल सुरू आहे, जी लवकरच भारतातील १९ शहरांमध्ये लागू केली जाईल. यासाठी एक मजबूत ४७०-५८२ मेगाहर्ट्झ स्पेक्ट्रम रिझर्व्ह करण्यात आला आहे.

८० कोटी युजर्सना मिळेल लाभ : त्यांनी म्हटलं आहे की व्हिडीओवरील २५ ते ३० टक्के ट्रॅफिक डी२एम वर शिफ्ट झाल्यामुळे ५जी नेटवर्कवरील लोड कमी होईल. विशेष म्हणजे गेल्यावर्षी डी२एम टेक्नॉलॉजीच्या टेस्टिंग पायलट प्रोजेक्ट स्कीम अंतर्गत बंगळुरू, कर्तव्य पथ आणि नोएडामध्ये करण्यात आली होती. डी२एम टेक्नॉलॉजी देशातील सुमारे ८ ते ९ कोटी घरांना मिळेल. देशातील सुमारे २८ कोटी घरांपैकी फक्त १९ कोटी घरांमध्ये टेलिव्हिजन सेट आहेत, तर देशात ८० कोटी स्मार्टफोन युजर आहेत.

ही डी२एम टेक्नॉलॉजी आयआयटी कानपूरनं विकसित केली आहे. यात व्हिडीओ, ऑडियो आणि डेटा सिग्नल थेट मोबाईल आणि स्मार्ट गॅजेटवर पाठवला जातो. ही सर्व्हिस त्या प्रदेशांसाठी चांगली आहे जिथे नेटवर्क पोहोचणे कठीण आहे. तसेच ऑनलाईन शिक्षण, ऑनलाईन मेडिकल सुविधा देण्यास देखील ही टेक्नॉलॉजी हातभार लावेल.

५जीसाठी द्यावे लागतील अतिरिक्त पैसे : इकोनॉमिक टाइम्सच्या लेटेस्ट रिपोर्टमध्ये माहिती देण्यात आली आहे की जिओ आणि एअरटेल युजर्सना लवकरच मोठा धक्का देणार आहे.

आतापर्यंत जिओ आणि एअरटेलच्या ग्राहकांना ४जी च्या किमतीत ५जी सर्व्हिस मिळत होती, परंतु लवकरच हे बदलणार आहे. या दोन्ही कंपन्या ४जी प्लॅनमध्ये मोफत अनलिमिटेड ५जी ची सुविधा बंद करू शकतात. रिपोर्टनुसार, जिओ आणि एअरटेल दोन्ही ५जी साठी वेगळे नवीन प्लॅन लाँच करण्याची तयारी करत आहेत. हे प्लॅन्स २०२४ च्या उत्तरार्धात सादर केले जाऊ शकतात.

केसांना मेहंदी लावत असाल तर वाचा या उपयोगी टिप्स



- केसांना मजेंटा रंग द्यायचा असेल तर मेहंदीत जास्वंदीचे फूल कुस्करून टाका.
- हिवाळ्यात मेहंदी लावताना त्यात काही लवंगा पिसून टाका. सर्दीपासून बचाव होईल.
- सर्दीचा त्रास असल्यास मेहंदीत तेल, चहा किंवा कॉफी मिसळा. आवळा चूर्ण, बीट ज्यूस, दालचिनी, अक्रोड असे पदार्थही मिसळू शकता.
- ग्रे हेअर्सपासून बचावासाठी मेहंदीत एक कापूर आणि एक चमचा मेथी पावडर मिसळा.
- दोन चमचे संत्र्याच्या रसात दोन चमचे मेहंदी पावडर मिसळा आणि शॅम्पूनंतर केसांना लावून दहा मिनिटाने धुवून टाका.
- केसांना रंगवायचे असेल तर मेहंदी दोन चमचे चहाचं पाणी मिसळा.
- खूप केस गळत असल्यास मेहंदी गरम पाण्यात घोळून दोन तीन दिवसांत केसांच्या मुळाला लावा. केस गळणे कमी होईल.

पनीर खाल्ल्याने वजन कमी होण्यास मदत



मोठ्या प्रमाणात लोकांना पनीर आवडतं. त्याचे कारण म्हणजे, भारतीय जेवणात पनीरचे वेगवेगळे प्रकार बघायला मिळतात. भाज्यांसोबत पराठ्यांमध्ये पनीरचा वेगवेगळ्या प्रकारात समावेश केला जातो.

फक्त चवीत नव्हे, तर तुमच्या आरोग्यासाठी पनीर खूप चांगले आहे. कॅल्शियम भरपूर असल्याने, पनीर तुमच्या हाडांसाठी आणि दातांसाठी खूप फायदेशीर आहे. प्रोटीनयुक्त पनीर मासपेशींसाठी फायदेशीर आहे. पनीर खाल्ल्याने वजन कमी करायलाही मदत होते. पनीर प्रोटीनयुक्त आहे. वजन कमी करण्यास मदत होते. हे भूक कमी करणारे हार्मोन्स जीएलपी-१, पीवायवाय आणि सीसीकेच्या स्तराला वाढवतात. तिथेच भूक वाढवणाऱ्या हार्मोनच्या स्तराला कमी करतात. त्यामुळे डायटिंगला फायदा होतो. मात्र पनीर अतिप्रमाणात खाल्ल्यास वजन वाढू शकतं हे देखील लक्षात ठेवणं गरजेचं आहे.

पनीरचे फायदे

पनीरमध्ये गुड फॅट्स असतात. गुड फॅट्स वजन कमी करण्यात मदत करतात. पनीरमध्ये कार्बोहायड्रेट कमी प्रमाणात असतात. वजन कमी करण्यासाठी रोजच्या जेवणात लो-कार्ब असणे गरजेचे आहे. पनीरमध्ये कॅल्शियम मोठ्या प्रमाणात असते. कॅल्शियम हाडांना आणि दातांना मजबूत बनवतात आणि फॅट्स कमी करतात.

मानसिक आरोग्य चांगलं तंदुरुस्त ठेवण्यासाठी हे करा

दगदगीच्या जीवनशैलात तणाव निर्माण होणं साधारण गोष्ट आहे. त्यामुळे स्वत:ला मानसिकरीत्या तंदुरुस्त ठेवणं खूप मोठी गोष्ट आहे. जर आपले मानसिक आरोग्य चांगले असेल, तर आपल्या जीवनातल्या अडचणींना आपण सहज हाताळू शकतो. त्याच बरोबर आपल्या प्रगतीसाठी चांगल्या मानसिक आरोग्यची आवश्यकता आहे. मानसिक आरोग्य चांगलं राहण्यासाठी खूप उपाय आहेत.

नवीन काही शिकत रहा : मानसिक आरोग्य चांगलं ठेवण्यासाठी काहीतरी नवीन शिकत राहणे आवश्यक आहे. त्याचबरोबर तुम्हाला जे काम आवडते ते वेळ काढून केलं पाहिजे. त्यामुळे तुम्हाला मजा येईल आणि खूप शिकण्यास मदत होईल.

आरोग्यावर लक्ष ठेवा : म्हणतात की, चांगले आरोग्य असल्यास मेंदू ही चांगला राहतो. चांगले आरोग्य ठेवण्यासाठी तुम्हाला तुमच्या आहारावर लक्ष ठेवावे लागेल. त्यासाठी तुम्हाला पोषक आहाराचे सेवन करावे लागेल आणि खूप पाणी प्यायला पाहिजे. त्याशिवाय नियमित व्यायाम करा आणि पुरेशी झोप घ्या. धूम्रपान करू नये.

सकारात्मक लोकांसोबत वेळ घालवा : अशा लोकांसोबत राहा जे सकारात्मक विचार करतात. जे सामाजिकदृष्ट्या सक्रिय आहेत, ते लोक निरोगी असतात. त्यामुळे प्रसन्न राहण्यास मदत होते, लोकांसोबत चांगली वागणूक ठेवा, त्यासोबत चांगला विचारही करा.

दुसऱ्यांची मदत करा : प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न केले पाहिजे की जेव्हा दुसऱ्यांना गरज असेल, तेव्हा त्यांना मदत करा. दुसऱ्याला मदत केल्याने तुम्हाला खूप आनंद होईल. आनंदी राहिल्याने मेंदूला शांती मिळते.



ताणतणाव दूर ठेवा : आजच्या काळात प्रत्येकाला तणाव असतो. त्यामुळे शारिरीक आणि मानसिकदृष्ट्या आजार होतात. त्यामुळे आपल्याला तणावापासून लांब राहिले पाहिजे. तणावाला लांब ठेवायचे असेल तर व्यवस्थापन असले पाहिजे. म्हणून नियमित व्यायाम केला पाहिजे जसे की, खेळणे, फिरणे.

शांत रहा : जीवनात शांत राहण्यासाठी चिंतन आणि योग करा. त्यामुळे तुम्हाला मानसिकरीत्या शांती मिळेल आणि एकाग्रता वाढेल. शांत राहिल्याने मानसिक आरोग्य चांगलं राहील. त्यामुळे तुम्हाला आयुष्यात जास्त त्रास होणार नाही.

नेमकं काय करायचंय ते ठरवा : तुमच्या आयुष्यात तुम्हाला काय करायचे आहे, त्यासाठी गोल सेट करा. तुमच्या लक्ष्य काय आहे, त्यापर्यंत पोहचण्यासाठी काय करू शकता, ते लक्षात ठेवा. त्यासाठी व्यावहारिक मार्गाचा वापर करा. त्यामुळे तुम्हाला जे करायचं आहे, त्यापर्यंत तुम्ही आरामात पोहचणार. त्यामुळे तुम्ही मानसिकरीत्या निरोगी राहाल.

गरज असल्यास मदत घ्या : आयुष्यात खूप वेळा अडचणी येतात, त्यासाठी आपल्याला कधी कधी दुसऱ्यांची गरज भासते. त्यामुळे मदत मागितली पाहिजे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आपली अडचण कमी होते आणि मानसिकरीत्या आपण निरोगी राहतो.

भारतात मानसिक रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ

दर सात भारतीयांमध्ये एक जण मानसिक रुग्ण असल्याची माहिती संशोधनातून पुढे आली आहे. आरोग्य क्षेत्रातल्या आघाडीच्या लॅन्सेट या मॅग्झिनच्या सोमवारच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या अहवालातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. मानसिक रुग्णांची संख्या गेल्या १९९० ते २०१७ या काळात दुप्पट झाली आहे.

महाराष्ट्रासह दक्षिणेकडील राज्यात मानसिक रोगींची संख्या सर्वाधिक असल्याचंही अहवालात पुढं आलं आहे. देशातल्या एकूण महिलांपैकी ३.७ टक्के महिला नैराश्याला बळी पडत असून पुरुषांमध्ये नैराश्याचं प्रमाण २.७ टक्के असल्याचंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे. याआधी लॅन्सेट या मॅग्झिनने अहवालातून आणखी एक धक्कादायक बाब उघड केली होती. भारत प्रदूषणाच्या बाबतीत सर्वात वरच्या स्थानी असल्याचं अहवालानुसार सांगण्यात आलं आहे. सध्याच्या आकडीवारीच्या आधारे, २०१७ मध्ये प्रदूषणामुळे भारतात २३.२६ लाख लोकांचा अकाली मृत्यू झाल्याची माहिती या अहवालातून समोर आली. प्रदूषणाच्या विविध पातळ्यांवर भारताची स्थिती सर्वात खराब असल्याचं सांगण्यात आलं आहे.

चॉकलेट खाण्याचे 'हे' पाच फायदे माहीत आहेत का?



चॉकलेट म्हणजे आबालवृद्धांना आवडणारा पदार्थ. चॉकलेटचं साधं नाव जरी घेतलं तरी प्रत्येकाच्याच तोंडाला पाणी सुटतं. सध्या बाजारात विविध प्रकारचे, आकाराचे चॉकलेट मिळतात. त्यात सुद्धा डार्क चॉकलेट, व्हाईट चॉकलेट असे एक ना अनेक प्रकार आहेत. चॉकलेटच्या याच नव्या रंगरूपामुळे लहान-थोर सारेच त्याच्या मोहात पडतात. परंतु चॉकलेट केवळ खाण्यासाठी नसून त्याचे काही गुणधर्मही आहेत जे शरीरासाठी गुणकारी ठरतात. मात्र हे फायदे आपल्याला माहीत नाहीत. कोणताही पदार्थाचे अतिप्रमाणात सेवन केल्यास त्याचा दुष्परिणाम होणारच मात्र योग्य प्रमाणात त्याचे सेवन केले तर तो गुणकारी ठरू शकतो. याप्रमाणेच चॉकलेटचे योग्य प्रमाणात सेवन केले तर तो तुमची स्मरणशक्ती बळकट होण्यास मदत होते.

- चॉकलेटमध्ये कोको बीन हा मुख्य घटक असून यामध्ये असलेल्या फ्लावनोल्समध्ये शरीरातील पेशींचे संरक्षण करण्याची क्षमता असते. फ्लावनोल्स या घटकामुळे वयस्कर व्यक्तींची आकलन क्षमता, स्मरणशक्ती यांच्या कार्यामध्ये सुधारणा घडविण्यासाठी मदत होते.
- उतारवयात चेहऱ्यावर सुरकुत्या पडणे, त्वचा निस्तेज होणे यासारखे शारीरिक बदल होत असतात. मात्र चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करण्यासाठी चॉकलेटचे सेवन जरूर करावे.
- चॉकलेटमध्ये अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणावर असतात. त्यामुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करण्यासाठी चॉकलेट बाथ, फेशियल, पॅक आणि व्हॅक्स यासारखे पर्याय उपलब्ध झाले आहेत.
- नैराश्यग्रस्त असताना चॉकलेट खाल्ल्याने मानसिक ताण कमी होण्यास मदत होते. त्यामुळे या काळामध्ये चॉकलेट खाणे कधीही उत्तम.
- अचानक रक्तदाब कमी झाल्यावर चॉकलेट खाल्ले तर तत्काळ रक्तदाब नियंत्रणात येऊ शकतो.
- आजकाल अनेकांमध्ये कोलेस्ट्रॉलचे प्रमाण आढळून येते. शरीरातील एलडीएल कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि त्यामुळे होणाऱ्या आजारांना नियंत्रणात ठेवण्यासाठी चॉकलेट उपयुक्त ठरते.

ठाकूर श्यामनारायण पदवी महाविद्यालयाचे अभूतपूर्व विद्यादान

दै,जनप्रभात
मुंबई :-प्रतिनिधी

समुदाय सेवेच्या आनंददायी प्रदर्शनात, नडउढ च्या ठाकूर श्यामनारायण पदवी महाविद्यालय, कांदिवली पूर्व येथील राष्ट्रीय सेवा योजना (छडड) युनिट इ-६२ ने परिवर्तनात्मक उपक्रमासाठी रॉबिन हूड आर्मीसोबत सहकार्य करून सामाजिक कल्याणासाठी आपली ऊर्जावान बांधिलकी प्रदर्शित केली. कांदिवली पूर्व येथील महिंद्रा फ्लायओव्हर खाली जानेवारी २०२४ पासून प्रत्येक रविवारी, एनएसएस युनिट बी-६२ चे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी डॉ. कुणाल ठाकूर यांनी मार्गदर्शन आणि शिक्षणाची तळमळ असलेल्या रस्त्यावरील मुलांना शिकवण्याचे आणि त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे एक उदात्त मिशन सुरू केले. ''सुद्रिध शिक्षक'' नावाचा हा प्रकल्प समाजातील वंचित मुलांना शिक्षण आणि मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी छडड युनिटचे समर्पण प्रतिबिंबित करतो. डॉ. छडड युनिट इ-६२ चे आदरणीय कार्यक्रम अधिकारी कुणाल ठाकूर यांनी या प्रकल्पाबद्दल उत्साह व्यक्त केला. ते म्हणाले, ''शिक्षण हे एक शक्तिशाली साधन आहे जे गरिबी आणि अज्ञानाच्या साखळ्या तोडू शकते. याव्यतिरिक्त, छडड युनिट इ-६२ आणि रॉबिन हूड आर्मी मुलांना पौष्टिक जेवण वाटप करते, याची खात्री करून की भूक शिकण्यात अडथळा बनू नये. शिक्षण आणि पोषण यांडरे, छडड युनिट इ-६२ आणि रॉबिन हूड आर्मी रस्त्यावरील मुलांसाठी उज्वल भविष्य लिहित आहेत, हे सिद्ध करतात की जेव्हा समाज एका उदात्त हेतूसाठी एकत्र येतो तेव्हा त्याचा परिणाम अमर्याद असतो.



सिंदीत जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

दै,जनप्रभात
प्रशांत झाडे /प्रतिनिधी

सेलू. -तालुक्यातील सिंदी (रेल्वे) शहराच्या मुख्य मार्गावर असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून शिक्षक व संचालकासह सहा आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये एकूण १ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांच्या या धाडसी कारवाईमुळे अवैद्य व्यवसायिकांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

सिंदी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहराच्या मुख्य मार्गावर सिंदी विशाल विविध कार्यकारी सोसायटी समोर असलेल्या बजरंग रामचंद्र पाटील यांच्या राहत्या घरी पैसे लावून हार-जीत चा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती ठाणेदार वंदना सोनूले यांना मिळाली. सोनूले यांनी लगेच एक पथक तयार करून सायंकाळी अंदाजे ५ वाजताच्या सुमारास पंचासमक्ष पाटील यांच्या घरी छापा टाकला असता बंद घरातील एका खोलीमध्ये ५२ पत्त्यावर पैसे लावून हार-जीतचा जुगार खेळतांना आरोपींना रंगेहात पकडले. याप्रकरणी हेमंत उर्फ बजरंग पाटील (४६), खासगी शिकवणी वर्ग घेणारे शिक्षक बालू उर्फ शरद ज्ञानेश्वर तळवेकर (४७), खरेदी-विक्री संस्थेचे संचालक मुकेश नारायण ढोक (५२), संदीप उर्फ बालू गोविंद दुप्पलवार (४८), रवी केशव बेलखोडे (४०), मंगेश बबन बेलखोडे (३८), उमेश मारोतराव नखाते (५०) व मनोज ज्ञानेश्वर देवतळे (४५) यांच्यावर महाराष्ट्र जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांच्या या कारवाई दरम्यान, यातील आरोपी संदीप दुप्पलवार हा पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्याला घराच्या छतावर जाऊन पोलिस कर्मचाऱ्याने धावून पकडले तर उमेश नखाते हा सुद्धा घराच्या पूर्वेकडील सुरक्षा भिंत ओलांडून पळ काढत असतांना त्यालाही पोलिसांनी पकडले. शहराच्या मुख्य मार्गावर असलेल्या बजरंग पाटील यांच्या घरी मागील अनेक वर्षांपासून अवैधरीत्या ५२ पत्त्याचा लाखो रुपयांचा हार-जितचा जुगार खेळला जात होता. परंतु, आजपर्यंत कोणीही कारवाई केली नाही. परंतु, कर्तव्यदक्ष महिला



पोलीस निरीक्षक वंदना सोनूले यांनी ही कारवाई केल्याने त्यांच्या या धाडसी कारवाईचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

याप्रकरणी पोलिसांनी आरोपींची अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून ५ मोटारसायकलसह एकूण एक लाख ५५ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार बंदी कायद्याच्या कलम ४.५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांच्या आदेशानुसार ठाणेदार वंदना सोनूले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी मनोहर चांदेकर, संजय भगत, संदेश सयाम, शीतल मुन शुभांगी चाफले, सचिन उईके यांनी केली आहे.

****

कार पिकअपच्या अपघातात आणखी एका वनरक्षकाचा मृत्यू

दै,जनप्रभात
जयश्री मेंघरे / वैद्य

रामटेक - रामटेक बायपास तुमसर मार्गावर दि.२४ जानेवारी रोजी रात्री २ वाजताच्या सुमारास एका कार व पिकअप च्या धडकेत वनविभागाचे क्षेत्रसहाय्यक यांचा घटनास्थळी तर हंगामी मजुराचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली होती.त्याच अपघातात गंभीर स्वरूपात जख्मी झालेले पवनी (देवलापार) येथील वनरक्षक प्रदीप सूर्यवंशी यांच्यावर नागपूर येथे उपचार सुरू असताना त्यांच्यादेखील मृत्यू झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. प्राप्त माहितीनुसार,पवनी वनविभाग कार्यालयातील क्षेत्र सहाय्यक स्वप्नील जाधव आपल्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यासह कार क्रमांक एम,एच, ३३ -अ - ४ १३ २ हिने मित्राच्या लग्न सभारंभाच्या कार्यक्रमाला गोंदिया येथे गेले होते. लग्न समारंभाहून परत येताना रामटेक तुमसर बायपास मार्गावर विरुद्ध दिशेने येणाऱ्या एम,पी, २८ - ऋ - ४७७१ क्रमांकाच्या पिकअप ला त्यांच्या कारची जोरदार धडक झाली होती.अपघात इतका भीषण होता की, यात कारचा समोरील भागाचा चुराडा झाला होता तर पिकअप चा मागील भाग वेगळा झाला होता. या अपघातात पवनी वनविभागात कार्यरत असणारे क्षेत्र सहाय्यक स्वप्नील जाधव वय ३५ वर्ष यांचा घटनास्थळी मृत्यू झाला होता तर सोबत असेलेले मनोज इनवाते वय ३५ वर्ष याचादेखील उपचारादरम्यान मृत्यू झाला होता व अन्य प्रदीप सूर्यवंशी वय ३५ वर्ष व निकेश कुंभलकर वय ३० वर्ष. या दोन व्यक्तींची स्थिती गंभीर असल्याने त्यांना नागपूर मेडिकल येथे उपचार सुरू होते. मात्र गंभीर जखमी असलेले वनरक्षक प्रदीप सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला आहे.दिलदार व्यक्तिमत्व असणाऱ्या या व्यक्तीच्या अशा अचानक निघून गेल्याने पवनी परिसरात संपूर्ण शोककळा पसरली आहे. प्रज्ञा कॉम्पुटर एज्यूकेशन इन्स्टिटयूट चे संचालक रुपेश सरोदे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत म्हटले की, एक दिलदार व्यक्तीमत्व, एक चांगला माणूस या जगाला शेवटचा निरोप देऊन निघून गेला. ओळखी फक्त एक दोन वर्षाची पन त्यांचा दिलदार स्वभावामुळे खुप वर्षाचे जुने मित्र असावे असे वाटायचं. एक चांगला भला माणूस आपल्यातुन कायमचा निघून गेला. साहेब!!! तुम्ही कायम नेहमी आमच्या स्मरणात राहाल... भावपुर्ण श्रद्धांजली साहेब. असे शब्द बोलून रुपेश सरोदे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.




****

सुराज्य निर्माण सेनेचा एकच नारा महाराष्ट्रामधील दुकांनाच्या पाट्या मराठी करा

दै,जनप्रभात
उपसंपादक / राठोड रमेश पंडित

इंदापूर:- सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून सर्व जिल्ह्यांमध्ये मा. जिल्हाधिकारी, प्रांत कार्यालय, तहसिलदार कार्यालय यांना लेखी निवेदन देऊन मराठी पाटया लावण्यात याव्यात अशी मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहे.महाराष्ट्र दुकाने व आस्थापना' अधिनियम २०१७ मध्ये महत्त्वाची सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार, दुकान (Shop) किंवा आस्थापना छोटी असो वा मोठे त्यावर मराठी पाटी (BoaA°d) लावायलाच हवी अशी सुधारणा या विधेयकात करण्यात आली आहे. याआधी दहापेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापना व दुकान नियमातून पळवाट काढत असल्याचे आढळून आले होते. ही पळवाट काढून टाकण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या (Cabinet) बैठकीत घेण्यात आल्यानंतर याविषयीचे विधेयक विधीमंडळात मांडण्यात आले. विधिमंडळात हे विधेयक मांडून त्यावर मंजुरीची मोहोर उमटविण्यात आली. राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतर याचे कायद्यात रूपांतर होणार आहे , मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे व सर्व संस्था , दुकाने , आस्थापनांना मराठी भाषेत पाटया लावणे व व्यवहार करणे हे दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार बंधनकारक असून सुध्दा मराठी भाषेमध्ये दुकान, संस्था, आस्थापना च्या पाट्या मराठीतून दिसत नाहीत तरी महाराष्ट्रातील सर्व तालुक्यातील सर्व महसुली गावामध्ये मराठी भाषेमध्ये पाटया त्वरित लावण्या संदर्भात कारवाई करण्यात यावी तसेच प्रशासनास दि.१ मार्च २०२४ पर्यत मुदत देण्यात येत आहे तरी आपल्या तलाठी कार्यालयाकडून गावांमध्ये किती मराठी भाषेमध्ये पाटया आहेत व इंग्रजी व इतर भाषेमध्ये किती दुकाने आस्थापनांना पाटया आहेत यांचा अहवाल सुराज्य निर्माण सेनेने मागितला असल्याचे माहिती सुराज्य निर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष आकाश पवार यांनी पत्रकारांना दिली.

उपविभागीय नायब तहसीलदार यांनी सांगितले की,आम्ही आमच्या परिक्षेत्रातील सर्व तहसिलदारांना , गटविकास अधिकारी , कृषी अधिकारी यांना तात्काळ लेखी आदेश काढून कारवाई करायला लावू अशी माहिती त्यांनी दिली



रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे मराठी विभागाच्या माध्यमातून 'मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य विकास' कार्यशाळेचे आयोजन



दै,जनप्रभात / दिलीप येवले

कोराडी,;- छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था डरा संचालित, रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे मराठी विभागाच्या माध्यमातून मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे मा. देवेश गोंडाणे वरिष्ठ पत्रकार लोकसत्ता, प्रभारी प्राचार्या डॉ. अर्चना कहाळे पत्की, माजी प्रभारी प्राचार्य पंकज झगडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. निकोसे, मराठी विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले, त्याचप्रमाणे पाहुण्यांचे स्वागत शब्दसुमनांनी करण्यात आले. आपण सर्व भाषा विषयाचे विद्यार्थी आहोत. त्यामुळे मानवी समाजातील भाषेचे महत्त्व आपल्याला सर्वप्रथम माहिती असायला हवे आपल्या संवाद क्षमतेत खऱ्या अर्थाने क्रांती झाली ती आधुनिक मुद्रण तंत्राच्या मदतीने, प्रबोधनाचे युग व औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली. प्रभावी अभिव्यक्तीसाठी व व्यक्तिमत्व विकासासाठी अभिव्यक्तीच्या विविध रूपांचा विकास तसेच विविध भाषिक कौशल्यांचा विकास विद्यार्थ्यांनी करावा असे वक्तव्य मा. देवेश गोंडाणे यांनी केले. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. मारोती वाघ आणि संचालिका सौ. लता वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी यांनी केले, तर सूत्रसंचालन लतिशा ककोडिया यांनी केले आणि आभार दीक्षा माने यांनी मानले. अध्यक्षीय मनोगत प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना कहाळे पत्की यांनी मांडले.उन्मेष या मराठी अभ्यास मंडळाने संपूर्ण कार्यक्रम कार्यशाळेचे नियोजन केले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

चांगल्या समाजनिर्मितीसाठी इतिहासाचा अभ्यास हा वैज्ञानिक दृष्टीने केला पाहिजे-डॉ.राम पूनियाणी

दै,जनप्रभात
दिलीप येवले /प्रतिनिधी

कोराडी :- आज देशाचे राजकिय नेते देशाचे राजकारण करीत आहे. पूर्वी अनेक राजांनी मंदिरे तोडली परंतु त्यामागे धर्म हे कारण नव्हते तर अनेक राजांनी संपत्ती व धनासाठी मंदिरे तोडलेली आहेत. इस्लाम कसा आला त्याचे अनेक दाखले त्यांनी आपल्या उदाहरणात दिले.इस्लाम भारतामध्ये सातव्या शताब्दीत आल्याचे इतिहासकारांचे म्हणणे आहे. सम्राट अशोकाने प्रेमाने सर्व जगामध्ये आपला बौद्ध धर्म पसरविला आहे. आणि हिंदू आणि मुस्लिम लढाया यांची सुरुवात कशी झाली नंतर इंग्रज कसे आले .औरंगजेब व शिवाजी महाराज यांच्या लढाया ह्या धार्मिक नव्हत्या तर त्या संपत्ती व साम्राज्य निर्माण करण्याच्या आधारावर होत्या असे मत मांडले परंतु आपण हिंदू आणि मुस्लिम राजे यांनी धर्मासाठी लढाया केल्या असा गैरसमज करून घेत आहोत. मानव निर्मितीचा इतिहास हा आफ्रिकेतून झाला तसेच राष्ट्रवाद हा अनेक प्रकारचा असून तो वेगळा इतिहास उभा करतो. भगतसिंग हे नेहरूंना आदर्श मानत होते परंतु आज काही नेते समाजात द्वेष पसरवून हिंसा करून घेतली जाते. परंतु हिंसा ही देश व समाजाला मागे घेऊन जात असते. पाकिस्तान, बांगलादेश ,श्रीलंका ही त्यांची ज्वलंत उदाहरणे आहेत. इतिहासाचा अभ्यास हा वैज्ञानिक दृष्टीने केला पाहिजे, त्यामुळे चांगला समाज बनण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतो.असे मत डॉ.राम पूनियाणी यांनी आपल्या अभ्यात्मक विश्लेषणातून मांडले.



तायवाडे महाविद्यालय कोराडी आणि रिसर्च अकादमी ऑफ सोशल सायन्स(ठअअड) मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ''भारतीय इतिहास: मिथक आणि वास्तव'' या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय परिषदेत तृतीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले . तृतीय सत्रामध्ये डॉ. भीमराव हटकर ,भरत नखाते, श्री श्याम देवकर, कुमारी नीलिमा झिंगरे इत्यादी संशोधकांनी पेपरचे वाचन केले. या सत्राचे अध्यक्ष स्थानी डॉ. जगदीश सोनवणे (इतिहास अभ्यास मंडळ चे अध्यक्ष, पुणे विद्यापीठ, पुणे) हे उपस्थित होते त्यांनी या सत्रातील अध्यक्षीय भाषणात संशोधकांनी सादर केलेल्या पेपरवर आपले विश्लेषण आणि निष्कर्ष मांडले. या तिस-या सत्राचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार डॉ. रवींद्र बाहेकर यांनी मानले. परिषदेच्या चतुर्थ सत्रामध्ये संशोधकांडरे पेपरचे सादरीकरण करण्यात आले. या सत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ताराचंद गेडाम हे होते. या सत्रामध्ये प्रा. योगेश करवाडे, डॉ. राजेंद्र डोनाडकर, डॉ. कैलास फुलमाळी आणि डॉ. विलास फरकाडे या संशोधकांनी पेपरचे वाचन केले. नंतर कार्यक्रमाध्यक्ष डॉ. गेडाम यांनी संशोधकांनी मांडलेल्या संशोधन पेपरचे विश्लेषण आणि निष्कर्ष मांडले, तसेच त्यांनी स्त्रीमुक्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कोड बिल यावर आपले विचार व्यक्त केले.

या परिषदेच्या समारोपीय कार्यक्रमांमध्ये व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राम पूनियाणी(इतिहासकार व सामाजिक कार्यकर्ता), कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, (तायवाडे कॉलेज कोराडी) , प्रमुख अतिथी म्हणून श्री ख्वाजा ऊस सय्यदिन (डायरेक्टर , अर्किओलॉजी सर्वे ऑफ इंडिया), प्रमुख अतिथी म्हणून प्रो. डॉ. श्याम कोरेटी (अधिष्ठाता समाज विज्ञान शाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर), प्रो.डॉ.अन्वर हुसेन (प्रोग्राम कोऑर्डिनेटर, औरंगाबाद) तसेच परिषदेचे सचिव, डॉ. शरद डवरे (इतिहास विभाग प्रमुख तायवाडे कॉलेज, कोराडी), डॉ.असिफ अहमद, कोऑर्डिनेटर रास, मुंबई, सलीम खान साहब (रास ,मुंबई), इत्यादी मान्यवर व्यासपीठावर विराजमान होते. याप्रसंगी अतिथींचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण श्री सलीम खान साहब यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात म्हटले की खरा इतिहास हा लपविला जात आहे. त्यासाठी सत्य इतिहास हा बाहेर आणण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले. असे त्यांनी आपले मत मांडले. यानंतर प्रोफेसर योगेश करवाडे, लाखनी. प्रोफेसर शेख अर्षद, दिल्ली, नीलम झिंगरे, भंडारा, श्रुती लाड, भंडारा, यांनी आपली मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमाचे अतिथी प्रो. डॉ. श्याम कोरेटी यांनी मार्गदर्शन करताना मध्ययुगीन भारताच्या ट्रायबल इतिहासावर प्रकाश टाकला. आणि अनेक राजे जसे गोंड राजे यांनी देवगड, नागपूर इत्यादी ठिकाणी आपले राज्य कसे पसरविले, चांद, तेलंगाना, शिरपूर बल्लारपूर इत्यादी ठिकाणची राजांच्या सत्ता आणि त्यांच्या राज्यातील किल्ले, गढ, मामा तलाव, अकोट, बावडी, विहिरी याविषयी माहिती दिली. जंगल जल जमीन यांचे संरक्षण आदिवासींनी केलेले आहे. बाराव्या शतकापासून तर १९व्या शतकापर्यंत या आदिवासी राजांनी अनेक ठिकाणी राज्य केल्याचे पुरावे इतिहासात सापडते. अनेक राजांनी अस्मिता व आपले अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न केले पण आज आदिवासी राजा मात्र रंक बनले असे त्यांनी आपले मत मांडले.श्री ख्वाजा ऊस सय्यदिन यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की तारीख या शब्दाला इतिहासामध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे. तारीख ही भूतकाळ आणि वर्तमान काळाला जोडते.मसमारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्ष व प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे यांनी म्हटले की कोणत्याही गोष्टीकडे किंवा घटनेकडे आपण कोणत्या चष्म्यातून बघतो यामुळे चांगल्या इतिहासाची निर्मिती होऊ शकते. इतिहासाचा अभ्यास हा सत्य घटना व दाखले यांचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करून अभ्यास केला तरच खरा इतिहास आपल्याला मिळतो. असे मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जावेद शेख यांनी केले. आभार डॉ. अयुब खान आणि डॉ. शरद डवरे यांनी संयुक्तिकरित्या मानले. या कार्यक्रमाला विविध प्राध्यापक संशोधक विद्यार्थी , महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि परिसरातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिषदेसाठी मद्रास, मुंबई, येथील पदाधिकारी तसेच तायवाडे महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग यांचे सहकार्य लाभले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा पिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242